बुधवार, १३ मार्च २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २००
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 13 MARCH 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-200 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# उद्योगपतींना कर्जमाफी; गरिबांचा रुपयाही माफ नाही

## भारत जोडो न्याय यात्रेत राहुल गांधींचा सरकारवर हल्लाबोल




आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार : आदिवासी हे देशाचे खरे मालक आहेत, या देशातील जल, जंगल व जमीनीवर पहिला हक्क आदिवासींचा आहे. परंतु भारतीय जनता पक्ष आदिवासींना वनवासी म्हणून हक्कापासून वंचित ठेवत आहे. भाजपा सरकार दलित, आदिवासींची जमीन ताब्यात घेऊन अदानीला देत आहे. आदिवासांचे हक्क हिरावून घेतले जात आहेत. परंतु काँग्रेस पक्ष आदिवासींच्या हक्काचे रक्षण करणारा आहे. देशात आदिवासींची ८ टक्के लोकसंख्या आहे, पण त्याप्रमाणात सत्तेत भागिदारी नाही. काँग्रेस सत्तेत आल्यानंतर हे चित्र बदलणार व ज्यांची जेवढी लोकसंख्या तेवढाच हक्क दिला जाईल. आदिवासींचे, जल, जंगल, जमीन हक्क अबाधित ठेवणार, असे आश्वासन खासदार राहुल गांधी यांनी दिले.**

भारत जोडो न्याय यात्रेची महाराष्ट्रातील सुरुवात नंदूरबारमधून झाली. यावेळी राहुल गांधी यांनी होळीच्या सणाचा मान देण्यात आला होता, सभेला संबोधित करताना राहुलजी गांधी यांनी होळीच्या शुभेच्छा देत आदिवासी व वनवासी यातील फरक समजावून सांगितला, ते म्हणाले की, आधार कार्ड योजनेची सुरुवात युपीए सरकारने नंदूरबारमधून केली होती, यातून आदिवासींची ओळख स्पष्ट करणारा संदेश दिला होता. देशात आज २२ लोकांकडे जेवढी संपत्ती आहे तेवढी संपत्ती ७० कोटी लोकसंख्येकडे आहे, ही विषमता आहे.आदिवांसींची ८ टक्के लोकसंख्या आहे पण देशातील कोणत्याच क्षेत्रात आदिवासींची ८ टक्के भागिदारी नाही. युपीए सरकारने आणलेला जमीन अधिग्रहण कायदा भाजपा सरकारने कमजोर केला आहे, सत्तेत आल्यास पुन्हा हा कायदा मजबूत केला जाईल. जातनिहाय जनगणना केली जाईल, शेतमालाला एमएसपीचा कायदा लागू करणार,ज्या भागात आदिवासींची ५० टक्के लोकसंख्या आहे तेथील सर्व निर्णय घेण्याचा अधिकार आदिवासींना दिला जाईल, ६ व्या शेड्युलमध्ये त्याचा समावेश केले जाईल. मनरेगावर २४ वर्षात जेवढा खर्च केला जातो तेवढ्या रकमेचे म्हणजे तब्बल १६ लाख कोटींचे २२ उद्योगपतींचे कर्ज माफ केले पण आदिवासी, गरिबांचा एक रुपयाही माफ केला नाही.



**नंदूरबारचा खासदार काँग्रेसचाच होईल : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले :** १२ मार्च रोजी महात्मा गांधी यांनी जुलमी ब्रिटीश सत्तेविरोधात दांडी यात्रा काढली होती . तसेच महाराष्ट्राचा मंगल कलश आणणारे यशवंतराव चव्हाण यांची जयंतीही आजच आहे आणि आदिवासींच्या होळीचा पहिला दिवस आहे . अशा या मंगलमय वातावरणात राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो न्याय यात्रेने छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकरांच्या पावन भूमीत आगमन झाले आहे . आज महाराष्ट्रात खोके व बोके यांचे भ्रष्ट सरकार आहे . नंदूरबारमधून जेव्हा जेव्हा काँग्रेसचा खासदार निवडून येतो तेव्हा केंद्रात काँग्रेसचे सरकार येते . यावेळी नंदूरबारचा खासदार काँग्रेसचाच होईल व केंद्रात काँग्रेसची सत्ता येईल .

या सभेला प्रभारी रमेश चेन्नीथला, बाळासाहेब थोरात, माजी मंत्री के. सी. पाडवी, खा. चंद्रकांत हंडोरे, आदिवासी काँग्रेसचे अध्यक्ष शिवाजीराव मोघे, जयराम रमेश, आशिष दुवा, बीएम संदीप, रामकिसन ओझा, बी. व्ही श्रीनिवास, लालजी देसाई, प्रणिती शिंदे, खा. शक्तिसिंह गोहिल, नाना गावंडे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, विलास औताडे, विशाल मुत्तेमवार, युवक काँग्रेसचे महाराष्ट्राचे अध्यक्ष कुणाल राऊत, माजी न्यायाधीश बी.जी. कोळसे पाटील, अनुसुचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबीरे, आदिवासी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डॉ. नामदेव उसेंडी, प्रतिभा शिंदे, नंदूरबार जिल्हा काँग्रेस अध्यक्ष शिरिष नाईक आदी उपस्थित होते.

# अजितदादांनी सन्मान गमावला : खडसे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. महायुतीत अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाला तीन ते चार जागा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यावरून एकनाथ खडसे यांनी अजित पवारांना टोला लगावला आहे. खडसे म्हणाले की, शरद पवार यांच्यासोबत असताना अजित पवार यांना जी सन्मानाची वागणूक होती. तो सन्मान अजित पवार यांनी हरवला आहे. आज अजित दादांकडे 50 हून अधिक आमदार आहेत. 50 आमदार आणि स्वतः उपमुख्यमंत्री असतानाही अजित दादांना त्यांच्या बायकोसहित तीन जागांवर समाधान मानावे लागत आहे.  मला वाटतं हे चित्र बरोबर नाही.

# सोन्याच्या भाववाढीमुळे विवाहाच्या खर्चाचे बजेट कोलमडले

## लगीनसराईत वधूवरांचे पालक चिंताग्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** स्त्री गरीब असो की श्रीमंत, उच्च शिक्षित असो की, अशिक्षित शहरी भागातील असेल किंवा ग्रामीण भागातील किंवा खेड्यातील वाडीवस्तीवरील. मात्र आपल्या गळ्यात तोळाभर सोन असायलाच हवे ही भारतीयांची पूर्वपार आलेली परंपरा. सोन्याच्या भावात मोठ्या प्रमाणावर होत असलेली वाढ व मार्च महिन्यात सोने ६६ हजार रुपये तोळ्याच्या घरात गेल्यामुळे ज्यांच्या घरात लगीन घाई तयारी सुरू आहे. अशा वधू-वरांच्या पालकांच्या चिंतेत मोठी वाढ झाली आहे. त्यातच सर्व प्रकारच्या खर्चात वाढ धक्कादायक असल्याने लग्नाचे बजेट खर्च आवाक्याच्या बाहेर जात असल्याने मोजक्या लोकांत लग्न करण्याची पद्धत देखील सुरू झाली आहे. शुभ विवाह म्हटले की मनी मंगळसूत्र गंठण कानातील फुले रिंग तर नवरदेवासाठी हातातील अंगठी ब्रेसलेट चैन या प्रमुख बाबी असतात. सोन्याचा मोह हा पुरातन काळापासून भारतीयांना राहिलेला आहे. सोन्याचा मोह हा महिला वर्गात मोठ्या प्रमाणावर असतो महिला नेहमीच दोन पैशाची बचत करून सोन्याची खरेदी करत असतात. त्याला गरीब श्रीमंत ही



अपवाद नाही. संकटप्रसंगी तत्काळ पैसे उपलब्ध होणारी सोने हा एकमेव अलंकार आहे. सोन्याचे भाव आवाक्याच्या बाहेर जरी जात असले तरी सोन्याच्या खरेदीत थोडाफार फरक होत असला तरी मागणी मात्र टिकून असते. सोन्याचे वाढते भाव गरिबांचे मात्र आर्थिक बजेट कोसळणारे आहे. त्यातच मजुरीच्या दरातदेखील वाढ झाली आहे. जितके दागिने कलाकुसर केली जातात त्यावर मंजुरी ठरत असते. डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण सध्या सुरू आहे. सोने आयात करावे लागत असल्याने ते महाग होते. त्याचा परिणाम हा सोन्याच्या भावावर होत असतो. लोकांचा सोन्याच्या गुंतवणूकीकडेदेखील कल वाढलेला आहे. जागतिक पातळीवर लोक सोन्याच्या बिस्किट यामध्ये गुंतवणूक करत असतात. इस्राईल-हमास या दोन देशात सुरू असलेल्या युद्धाचा देखील परिणाम सोन्याच्या भाव वाढीवर झालेला आहे.

# लोणार तहसील कार्यालयाला आले पारध्यांच्या पालाचे स्वरूप

## उदरनिर्वाह करण्यासाठी भाडेतत्त्वावर जमीन व राहण्यासाठी घर देण्याची मागणी


आधुनिक केसरी न्यूज

यासीन शेख

लोणार : पारधी समाजाला उदरनिर्वाह करण्यासाठी आणि राहण्यासाठी घराची व्यवस्था करण्यात येऊन शेत जमीन भाडेतत्त्वावर देण्यात यावी यासाठी दि. 22 फेब्रुवारीपासून तालुक्यातील खुरमपूर व इतर गावातील पारधी समाजातील लोक एकत्र येऊन तहसील कार्यालयासमोर मुलाबाळासह जनावरे आणून ठाण मांडून बसल्याने तहसील कार्यालयाला पारध्याच्या पालाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. तालुक्यातील खुरंपुर व इतर गावातील पारधी बांधव एकत्र येऊन त्यांनी दिं २० फेब्रुवारीला तहसीलदार यांना निवेदन दिले. त्यामध्ये त्यांनी सांगितले पारधी समाज बुलढाणा जिल्ह्यातील वेगवेगळ्या गावातील रहिवासी असून आम्हाला उदरनिर्वाह करण्यासाठी भाडेतत्त्वावर जमीन व राहण्यासाठी घराची व्यवस्था करण्यात यावी, असे न केल्यास आम्हाला लोकशाही मार्गाने आपल्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करावे लागेल. आंदोलनादरम्यान आमच्या जनावराचे काही बरे वाईट झाल्यास शासन व प्रशासन जबाबदार राहील. या आंदोलनात पारधी बांधव महिला मुलाबाळासह जनावरे घेऊन तहसील कार्यालय समोर तंबू टाकून बसले आहेत. यामुळे तहसील कार्यालयाच्या परिसरात घाणीचे साम्राज्य वाढले. सर्व विधी उघड्यावर करत असल्याचे तेथील उपस्थित मंडळी बोलत होती. याकडे वरील पातळीवरून लक्ष देण्याची गरज आहे. यासंदर्भात तहसीलदार जोशी यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की आम्ही त्यांना पत्र तयार करून आपल्या मागण्या शासनाकडे पाठवीत आहोत. ते पत्र सुद्धा त्यांनी घेण्यास नकार दिला. त्यांच्या निवेदनावर 32 बांधवांच्या सह्या असल्याचे निवेदन आढळून आले.








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# समर्थ रामदास आणि श्रीराम

आधुनिक केसरी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी जनजागृती करून समर्थांनी अनुकूल पार्श्वभूमी निर्माण करून मोठे साहाय्य केले. शिवरायांच्या स्वप्नातील स्वराज्य जेव्हा प्रत्यक्षात अवतरले, तेव्हा समर्थांचा आनंद पुढील शब्दात प्रकट झाला आहे. बुडाला औरंग्या पापी ।
म्लेंच्छसंव्हार जाहला ।।
मोडिली मांडली क्षेत्रे । आनंदवनभुवनी ।।
श्रीरामाची उपासना करताना समर्थांना पुढील प्रचिती आली. तोच उपदेश त्यांनी जनसामान्यांना उद्देशून केला. ते म्हणतात
मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोन जाते ।
कृपा केलिया रघुनाथे । प्रचिती येते ।।
लोकांनी सजग व्हावे, सावधान व्हावे, ज्ञान मिळवावे. रामोपासना करावी यासाठी ते रामरायाला साकडे घालतात
कल्याण करी रामराया । जनहित विवरी ।
अपराधी जन चुकतचि गेले । तुझा तूचि सावरी ।।
हे त्यांचे वैश्विक कल्याणासाठीचे रामरायाला मागणे आहे. आजही समर्थ रामदासांनी स्थापन केलेल्या मठांतून रामभक्तीचा प्रसार, हनुमंताच्या बलोपासनेचा आदर्श आणि समर्थांनी उपदेश केलेल्या ' आधी प्रपंच करावा नेटका, मग घ्यावे परमार्थ विवेका ' या दिशेने कार्य सुरु आहे. आज दासनवमी आहे. असे महान कार्य करणाऱ्या समर्थ रामदासांच्या चरणी वंदन.







## आनंदी पहाट

# परस्परांमध्ये संवाद होत राहण्याची गरज

आधुनिक केसरी

परस्पर संवाद कौशल्य असलेले लोक त्यांच्या सभोवतालच्या लोकांशी संवाद साधण्याच्या आणि त्यांना प्रेरित करण्याच्या क्षमतेमुळे चांगले नेते बनू शकतात. सर्व आंतरवैयक्तिक कौशल्ये कामाच्या ठिकाणी लोकांना फायदेशीर ठरू शकतात, परंतु एक संघ म्हणून काम करणे आणि सामायिक उद्दिष्टे गाठण्यासाठी परस्परसंवाद साधणे ही गुरुकिल्ली आहे. परस्पर संवाद कौशल्यांच्या इतर फायद्यांमध्ये समस्या सोडवण्याची आणि चांगले निर्णय घेण्याची क्षमता समाविष्ट असते. परस्पर संभाषण कौशल्ये आणि इतरांना समजून घेण्याची क्षमता वापरून आपण सर्वोत्तम उपाय शोधू शकतो. संवादात सहभागी असलेल्या प्रत्येकासाठी सर्वोत्तम निर्णय घेऊ शकतो. आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात व्यक्तींशी संवाद साधण्यासाठी आणि कार्य करण्यासाठी परस्पर संवाद कौशल्ये महत्त्वपूर्ण असतात. मजबूत परस्पर संवाद कौशल्य असलेले लोक चांगले संबंध निर्माण करतात आणि इतरांसोबत चांगले काम करू शकतात. ते कुटुंब, मित्र, सहकारी आणि ग्राहकांना चांगले समजतात. लोक सहसा चांगले परस्पर संवाद कौशल्य असलेल्या सहकाऱ्यांसोबत काम करताना आनंद घेतात. अनेक नियोक्ते मजबूत परस्पर संवाद कौशल्यांसह कर्मचारी नियुक्त करण्याचा प्रयत्न करतात; कारण अशा व्यक्ती सहसा सांघिक काम चांगले करतात आणि त्यांच्या सहकार्यांसह प्रभावीपणे सहयोग देखील करतात. सक्रियपणे ऐकणे म्हणजेच कोणीतरी बोलत असताना त्याच्याकडे पूर्ण लक्ष देण्याची आणि ते काय बोलत आहेत ते खरोखर समजून घेण्याची क्षमता असणे होय. सक्रियपणे ऐकणे म्हणजे केवळ कोण काय म्हणत आहे, याकडेच लक्ष देणे केवळ इतकेच नाही, तर त्यांच्या गैर-मौखिक संकेतांकडे देखील लक्ष देणे समाविष्ट आहे. तुम्ही ऐकत आहात आणि त्यामध्ये स्वारस्य आहे हे दर्शविण्यासाठी अधूनमधून प्रश्न विचारणे अथवा काही प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

## विठ्ठलाचा छंद | लागो मना ||

अलंकार शोभे | तुळशीची माळ ||
नांदते त्रिकाळ| संतवृत्ती ||१||
घेता हरिनाम | पातके जळती ||
विकार पळती | दाही दिशा ||२||
हाती विणा टाळ | गोडी भजनाची ||
जोड प्रारब्धाची | भाग्यवंता ||३||
करावी अखंड | साधना नामाची ||
संगत कर्माची | सोडू नये ||४||
टीळा चंदनाचा | चारित्र्याचा गंध ||
विठ्ठलाचा छंद | लागो मना ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)


## वृक्षवल्ली आम्हा...

भारतीय माणूस अग्नी, प्रकाशाचा चाहता, आकांक्षी आहे. म्हणूनच सूर्य अनेकानेक प्रतीकार्थांनी त्याच्या दैनंदिन जीवनाशी एकरूप झाला आहे. या भूमीत प्रत्येक मानवात एक संतत्व लपलेले आहे. प्रत्येक संतात एक माणूस जागत असतो. म्हणूनच या दोन्हीतून निर्धन, फाटक्या जगण्याला मौल्यवान दृष्टी रत्नांची भरजरी झालर सहजपणे लाभली आहे. त्यामुळेच भारतीय माणसाचे अंतःकरण, आत्मा फक्त स्वतःपुरता मर्यादित नसून विश्वात्मक होण्याच्या तळमळीने व्याकुळ होत असतो. माझ्यात सर्व व सर्वात मी, अशा प्रकारची वैश्विकता-बुद्धी सक्रीय झाल्यावरच भारतीय मनाला पूर्ण सुखाचा आनंद अनुभवता येतो. संत तुकाराम - 'वृक्ष वल्ली आम्हां सोयरे, वनचरे' म्हणत सर्व सृष्टीला आपल्या भक्ती सुखात सहभागी करून घेतात. संत सावता, 'कांदा-मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी॥' म्हणत प्रकृती, निसर्गाच्या प्रवाहमान चेतन सत्तेला दैनंदिन जगण्याशी जोडतात. . विष्णुमय जगतात जगण्याला सुंदरता देणारा, तप बनवणारा, मनाला वश करणारा, संजीवनी प्राणशक्ती देणारा वृक्ष अर्थात वटवृक्ष सावित्रीच्या तेजाने लोकोपकारक बनला आहे.म्हणून त्याची पूजा आम्ही करतो इतकी उदारता आमच्यात आहे.जसा मुक्ताईच्या अनुग्रहाने अहंकारी वटेश्वर चांगदेवाचा संत चांगदेव झाला, तसाच हा वृक्ष सावित्रीच्या तेजाचा, प्राणशक्तीचा, त्यागनिष्ठेचा, अगाध बुद्धी सामर्थ्यांचा वाहक बनला आहे. महाकालाचा स्पर्श घेऊन चिरंतन बनलेल्या वटवृक्षाचे जीवनाशी नाते अनेक अर्थ संदर्भाच्या धाग्यांनी जोडलेले आहे. ते धागे उकलून शाश्वत मतितार्थ शोधणे, हे सणवार, व्रत, वैकल्याचे सुंदर देणे असेल, ते देण्याघेण्यासाठी निश्चितच तत्पर व्हावे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

झींगुर सम एक शब्द है,
ऊपर सुरुचि सोहात ।
सो अनहद मुरचंग है, बाजत रहि रहि
जात ।।३०।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
प्रथम अध्याय) ०२/०१/३० मूळ
भाष्याचा मराठी अनुवाद : वरच्या बाजूस
रातकिड्याच्या आवाजाप्रमाणे एक शब्द
होत आहे जो अत्यंत सुंदर , सुश्राव्य प्रतीत
होत आहे. हा अनहद मुरचंग (बाजा) आहे
जो राहून राहून वाजत आहे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# नाम व विकल्प !

आधुनिक केसरी



नाम घेऊ लागले की विकल्प उठतात आणि ते घेण्याबद्दलची निष्ठा कमी होते, याला काय करावे ? अशी तक्रार आपण सर्वसाधारणपणे करतो; पण असे होण्यातच नामाचे महत्त्व प्रस्थापित होते हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्य नाम घेऊ लागला की विकल्पांना असह्य होते, आणि आता हा नाम घेऊ लागला, आता आपली धडगत नाही, अशा धास्तीने त्यांची चळवळ चालू होते, आणि मनुष्याला नामापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करतात. विकल्प हे अती सूक्ष्म आहेत. त्यांचे उच्चाटन करायला त्यांच्यापर्यंत पोहोचणारा आणि तितकाच सूक्ष्म असा उपाय पाहिजे. तो उपाय म्हणजे भगवंताचे नाम. एखाद्या बिळात सर्प शिरला तर त्याला बाहेर काढण्याकरिता त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला तिथे राहणे असह्य करील असाच उपाय करणे जरूर असते. बाहेरून कितीही आरडाओरडा केला तरी त्याचा उपयोग होत नाही. बिळात धूर किंवा गरम पाणी सोडले की तो बाहेर येतो. त्याप्रमाणे, नाम घेतले की विकल्प उठतात, म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामाची आच जाऊन पोचली असे ठरते. तर मग नाम घेऊ लागल्यावर विकल्प येऊ लागले तर गांगरून न जाता, हे सुचिन्ह आहे असे समजून, विकल्पांच्या उच्चाटनाची गुरुकिल्ली मिळाली अशा जाणिवेने, जास्त आस्थेने नाम घेण्याचा निश्चय करावा, हाच त्याला उपाय. नामाबद्दल सुरुवातीला सर्वांचीच वृत्ती साशंक असते, पण आपण सतत नाम घेत गेल्यानेच विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही; आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम झाले. आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच; पण आपण आपले चालणे चालू ठेवावे. तसे, विकल्प आले तरी आपण आपले नाम सोडू नये. पण गंमत अशी होते की, वाईट मनुष्य भेटला आणि आपण त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी, तो मुद्दाम खाकरतो आणि आपले लक्ष वेधतो. अशा वेळी त्याच्याकडे पाहूनही आपण दुर्लक्ष करतो. त्याचप्रमाणे विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण आपले नाम सोडू नये. शंका घ्यायचीच झाली तर नाम चालू ठेवून घ्या, म्हणजे ते नामच शंकांचे निरसन करील आणि विकल्पांनाही हळूहळू पायबंद घालील. **९. पुष्कळ केलेले शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरविले की आपली वृत्ती निःशंक होतेच होते.**

# ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

स्वस्वरूपाच्या अनुसंधनाचा सतत अभ्यास करत रहातो. सतत अभ्यास चिंतन व बारकावे शोधत गेल्यानंतर त्याला सद्वस्तुंचा साक्षात अनुभव येतो. अशा प्रकारे स्वरूपसाक्षात्कार झालेल्यांना संत म्हणतात. संतांची प्रतिभा सतत जागी असते. संतांनी लिहिलेल्या ग्रंथसंपदेस *"अध्यात्मग्रंथ* म्हणतात.
तर सदवस्तूला ब्रम्ह म्हणतात . संत सांगतात की ब्रम्ह सर्व मानवी कल्पनांच्या पलीकडे आहे.स्थळ,काळ, निमित्त यांच्या कक्षेत वावरणाऱ्या द्रुष्य विश्वाचे ज्ञान करून देणारी बुध्दीसुध्दा मर्यादित आहे.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, १३ मार्च २०२४

adhunikkesari.com


# नाईट टुरिझम विकसित करणार : डॉ.भागवत कराड

## ग्लो गार्डनचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील हडको परिसरातील स्वामी विवेकानंद उद्यान येथे ग्लो गार्डनचे भूमिपूजन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांच्या शुभहस्ते आज करण्यात आले. गार्डनच्या माध्यमातून शहरांमध्ये नाईट टुरिझम विकसित करण्याचा एक भाग आहे. ग्लो गार्डन लहान मुले पर्यटक यांनाआकर्षणाचे केंद्र बिंदू राहील आणि शहराच्या विकासासाठी हे महत्वाचे पाऊल राहील,असे डॉ.कराड यांनी यावेळी म्हंटले. या कार्यक्रमास आमदार प्रदीप जयस्वाल,अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, नगरसेवक महेश माळवतकर, भाजपा हडको मंडळ अध्यक्ष सागर पाले, बेसिलचे उपमहाव्यवस्थापक विजय तिवारी आपटे, विजय पाटील, गणेश नागरे, प्रशांत भदाणे, देशमुख सर अभियंता महानगरपालिका यासह हडको परिसरातील भाजपचे पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. भारत सरकारच्या सार्वजनिक उपक्रम बेसिल ब्रॉडकास्टिंग इंजीनियरिंग कन्सल्टंट लिमिटेड यांच्या व्यावसायिक सामाजिक निधीतून हा ग्लो गार्डन उभा करण्यात येत आहे. आमदार प्रदीप जैस्वाल असे प्रतिपादन केले यांनी की, डॉ.कराड साहेब यांच्या प्रयत्नातून शहरात विविध विकासकामे सुरू आहेत महानगरपालिकेने गार्डनच्या सुविधा निर्माण केल्या पण ही आधुनिक सुविधा केंद्रीय राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांच्या पुढाकारातून प्रथमतः होत आहे. डॉ.कराड यांनी यावेळी सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या तीन लोकसभाप्रमुख माझ्यावर जबाबदारी दिली आहे. गुजरात मधील नर्मदा जिल्ह्यामध्ये नर्मदा सरोवराच्या परिसरामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळा शेजारी ग्लो गार्डन पहिले. या ठिकाणी मोठ्यानाईट टुरिझम विकसित




झाली आहे. त्या ठिकाणी फुलपाखरू, आणि वेगवेगळ्या ट्रॅक निर्माण करण्यात आले असून त्या ठिकाणी लाइटिंग शो देखील असल्याने लहान मुलांना त्याचे मोठे आकर्षण आहेत. याच धर्तीवर छत्रपती संभाजीनगर शहरांमध्ये स्वामी विवेकानंद गार्डन येथे तीन ते चार एकर परिसरामध्ये ग्लो गार्डन विकसित करण्यात येणार आहे.केंद्र सरकारच्या ऊर्जा वित्त महामंडळ कडून दहा कोटी रुपयांच्या निधीतून ग्लो गार्डन होत आहेत.

# कन्नड येथे शिक्षण महर्षी स्व. कृष्णराव जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव शिक्षण महर्षी कृष्णाराव काशिनाथराव जाधव यांच्या 11व्यां स्मृती दिनाचे आयोजन जिजामाता परिवार कन्नड व शिक्षण महर्षी स्व. के. के. जाधव सर सेवाभावी प्रतिष्ठान कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमाचे आयोजन करून स्मृतिदिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम स्मृती स्थळावर अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांची उपस्थिती होती तर अध्यक्षस्थानी माजी आमदार नामदेवराव पवार प्रमुख उपस्थिती आमदार उदयसिंग राजपूत, मानसिंग पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष संजयजी खंबायते, नगराध्यक्ष संतोष कोल्हे ,उद्योजक मनोज पवार, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव, डॉ . चेतन जाधव, उदय जाधव ,प्राचार्य डॉ . विजय भोसले, डॉ विष्णू सुरासे, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा ताराबाई जाधव, शिवाजीराव जावळे ,काकासाहेब कवडे, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवानिवृत्त मुख्याध्यापक कचरू निकम यांनी केले.



11व्या पुण्यस्मरणार्थ अनंत राऊत यांनी विद्यार्थ्यांशी काव्यात्मक संवाद साधत जगात आई वडिलांसाठी दुसरे दैवत नाही ज्याला मायबाप कळले त्याला वेद कळले असे सांगत मी डोळे झाकतास मला राबणारी माय दिसते ही कविता सादर करत कुणीही आपल्या रंग रूप सौंदर्याचा अभिमान व न्यूनगंड मानू नये ती एक ईश्वरी देन आहे असे सांगत मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा, मायबाप, तुफान वादळी कविता भोंगा ,तुझ्या गावावरून या व एकापेक्षा एक सरस कविता सादर केल्या व उत्तम कथा सादरीकरण करीत शालेय विद्यार्थ्यांची व पालकांची मने जिंकून घेतली.
जिजामाता परिवारा च्या वतीने शालेय 100 विद्यार्थ्यांना आगामी वर्षासाठी शैक्षणिक दत्तक घेतले व गो शाळेत चारा वाटप करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी डॉ विशाखा जाधव, नगरसेवक संतोष निकम, साईनाथ अल्हाड भाऊसाहेब काळे, प्रा योगीराज सोमवंशी, प्राइड चे संचालक प्रा सतीश शर्मा,अमोल देशमुख, नंदकुमार शेजवळ शिवाजीराव गायकवाड, संतोष पवार, पत्रकार, मुख्याध्यापक आबासाहेब चव्हाण, बाळासाहेब निकम, हेमराज खोब्रागडे, पर्यवेक्षक रावसाहेब निकम, रवींद्र निळ ,परिसरातील बहुसंख्य पालक माता भगिनी यांची उपस्थिती होती.
कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिजामाता परिवारातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप सनंसे व आभार गणेश डव्हारे यांनी मांनले.

# लोणीत महिलादिनी होम मिनिस्टर कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** हल्ली होम मिनिस्टर हा कार्यक्रम महिलांचे विशेष मनोरंजन करणारा कार्यक्रम बनत चाललेला आहे. असाच आनंद लोणी ता.खंडाळा येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून होम मिनिस्टर (खेळ रंगला पैठणीचा) या कार्यक्रमातून महिलांनी घेतलेला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते व तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष अमित ऊर्फ बिरा शेठ कदम यांनी केले होते.या कार्यक्रमातून पुष्पा मोहन भोसले (प्रथम क्रमांक), अश्विनी सचिन कदम (व्दितीय क्रमांक), आशाताई नरेंद्र भोसले (तृतीय क्रमांक), ज्योती अमोल घुले (चतुर्थ क्रमांक) आणि सुरेखा मधुकर कदम( पंचम क्रमांक) आदी महिलांनी हे क्रमांक प्राप्त करित बक्षीसे मिळविली.मान्यवरांच्या हस्ते बक्षीसांचे वाटप करण्यात आले. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक रामदास कांबळे, माजी जिल्हाप्रमुख नंदकुमार घाडगे, युवा सेना जिल्हाप्रमुख माऊली पिसाळ, उपजिल्हाप्रमुख अजित यादव,सागर कदम, बाळकृष्ण कदम,भास्कर कदम, पोलीस पाटील संतोषी कदम,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या पक्षाच्या खंडाळा तालुकाध्यक्षा आशाताई भोसले, मंदाकिनी कदम, यशवंत कदम, सुजाता




कदम, आदी मान्यवर उपस्थित होते. पाच विजेत्यांना अनुक्रमे एलईडी, फ्रिज, आटा चक्की, कुलर आणि मिक्सर ही बक्षीसे देण्यात आली. अनुक्रमे सचिन शेडगे, भूषण ढमाळ, शुभम भैय्या लाड, नितीन साळुंखे, बंडा भोसले, संकेत कदम आदीनी बक्षीस देण्यासाठी विशेष सहकार्य केले. तसेच एक लकी ड्रॉ बक्षीस सुद्धा काढण्यात आले. यासाठी टेबल फॅन हे बक्षीस होते. शंभूराजे साळुंखे आणि भोळी गावचे तंटामुक्ती अध्यक्ष विशाल चव्हाण यांच्या कडून या बक्षीसासाठी विशेष सहकार्य लाभले. सुनंदा चंद्रकांत कदम या महिलेस लकी ड्रॉ बक्षीस मिळाले. या कार्यक्रमाचे सादरीकरण भुईंज येथील मयूरी पिसाळ यांनी केले. यावेळी विविध खेळ संपन्न होत असताना उखाणा, तळ्यात मळ्यात, बादलीत चेंडू टाकणे, चेंडूने ग्लास पाडणे, टिकली कपाळावर लावणे, सासर माहेर, फुगे फोडणे आदी खेळातून महिलांनी मनमुराद पणे आनंद लुटला.तीनशे हून अधिक महिला या कार्यक्रमास उपस्थित होत्या. तसेच येणाऱ्या प्रत्येक महिलेस आकर्षक भेटवस्तू देण्यात आली. या भेटवस्तू साठी प्रशांत गोळे आणि अजित साळुंखे यांचे विशेष सहकार्य लाभले. दरवर्षी असा हा कार्यक्रम घेतला पाहिजे. अशा प्रतिक्रिया सुद्धा महिला वर्गातून येऊ लागल्या आहेत.या आयोजना बद्दल अमित ऊर्फ बिरा शेठ कदम यांचे विशेष कौतुक तालुक्यातुन होत आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बंडा भोसले, पोलीस पाटील संतोषी कदम,ऋषभ कदम, स्वस्तिक पवार,ओम कदम,विक्रम मोहिते,अक्षय कदम,ओंकार कदम,निखिल कदम,विनायक लिमन,राज कदम आदींनी विशेष मेहनत घेतली.मंगेश ननावरे यांच्या साऊंड सिस्टीमवर विविध गाण्यावर ताल धरत चिमुकल्यांनी सुद्धा आनंद घेतला.हा कार्यक्रम अधिकच आनंदीमय बनल्याने असा कार्यक्रम आपल्या गावात दरवर्षी झाला पाहिजे.अशा भावना सुद्धा व्यक्त होऊ लागल्या आहेत.

# पुन्हा रामराज्य आणण्याची जबाबदारी आता महिलांची : पद्मश्री पोपटराव पवार

## सरला बेटाचे मठाधीपती प. पु. रामगिरी महाराज यांना संत कौस्तुभ पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** देशात पुन्हा रामराज्य आणण्याची जबाबदारी आता महिलांची असून पत्रकार संघाने नारी शक्तीचा सन्मान करून या जबाबदारीत भर घातली आहे, असे प्रतिपादन आदर्श गाव हिवरे बाजार चे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे वतीने सरला बेटाचे मठाधीपती प.पु. रामगिरी महाराज यांना संत कौस्तुभ पुरस्कार २०२४ त्यांचे हस्ते देण्यात आला. शिर्डी येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सवित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीच्या दिनी नारी शक्ती सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे हे होते. यावेळी शिवव्याख्याते प्रदीप कदम, पत्रकार संघाचे नवी मुंबई विभागीय अध्यक्ष दशरथ चव्हाण, साईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटी चेअरमन विठ्ठल पवार, प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव उपस्थित होते. सरला बेट चे मठाधिपती महंत रामगीरी महाराज यांनी पत्रकार हे समाजाचा आरसा असून महिला दिनी समाजातील विविध क्षेत्रातील महिलांचा केलेला सन्मान हा उपक्रम देखील आरसा म्हणून समाजापुढे राहिल असे सूतोवाच केले. पुरस्कार प्राप्त महिलांची जबाबदारी पुरस्काराने जास्त वाढली असून आपले कुटुंब गाव समाज व देशाप्रती योगदान द्यावे लागणार आहे. प्रत्येक महिलेने आपल्या कुटुंबात तसेच आजुबाजूला मोबाईल चा होणारा अतिरेक टाळण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे



सांगितले.स्वागत व प्रस्ताविकात राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, समाज कार्यातअसणाऱ्या पत्रकाराची पत्नी उपेक्षित राहते. तिचा सन्मान झाला पाहिजे म्हणून हा उपक्रम राबविला आहे.यावेळी सामाजिक व शैक्षणिक कार्य रामचंद्र मारुती सुपेकर, ओतूर गावचे युवा उपसरपंच प्रशांत डुंबरे, आदिवासी भागात वैद्यकीय सेवा डॉ. सुभाष सोमण, शिक्षण अधिकारी दिलीप थोरे, युवा उद्योजक राहुल भास्कर पाबळकर यांचा विशेष गौरव करण्यात येणार आला. नारी शक्ती सन्मान सोहळ्यात शिर्डीच्या नगरसेविका वंदना राजेंद्र गोंदकर यांनी यावेळी महिला दिनाचे महत्व विषद केले.शैक्षणिक कार्याबद्दल गिता राहणे, विडी कामगार चळवळीसाठीच्या कार्याबद्दल सखुबाई पुंजा वाकचौरे, विडी बांधून आपले तीन मुलांना शासकीय अधिकारी करणारी आदर्श माता शांता अशोक शेळके, रेश्मा वाळेकर, यांच्या सह ४१ महिलांचा नारी शक्ती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.यावेळी संत कौस्तुभ पुरस्कार मध्ये संत तुकाराम मूर्ती, पगडी, सन्मान चिन्ह, सन्मान पत्र, शाल देऊन महाराज यांना गौरविण्यात आले. तर महिलांना सन्मानपत्र, पैठणी, चांदीची लक्ष्मीची मूर्ती, शाल देऊन सपती गौरविण्यात आले.

## ठाकरे गटाचे टीकास्त्र

आधुनिक केसरी

गेल्या काही दिवसांपासून भारतीय जनता पक्षाचे खासदार अनंत हेगडे यांनी केलेल्या एका विधानाची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. या विधानाचा व्हिडीओही सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे. एका कार्यक्रमात अनंत हेगडे भाजपाला बहुमत मिळाल्यास संविधानात बदल करण्यासंदर्भात वक्तव्य करताना दिसत आहेत. यासंदर्भात देशभरात प्रतिक्रिया उमटू लागल्या असून त्यावर आता ठाकरे गटाकडून तीव्र शब्दांत टीका करण्यात आली आहे. या विधानाचा संदर्भ घेत ठाकरे गटाने भाजपा व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. भाजपा खासदार अनंत हेगडे यांनी 'चारशे पार'चे मनसुबे उघड केले आहेत. भाजपाला चारशे पारचे बहुमत यासाठी हवे आहे की, त्या पाशवी आकड्याच्या बळावर भाजपास देशाचे पवित्र संविधान बदलायचे आहे. हे वक्तव्य गंभीर आहे, अशा शब्दांत सामना अग्रलेखातून अनंत हेगडेंच्या वक्तव्यावर तीव्र आक्षेप घेण्यात आला आहे. मुसोलिनी, हिटलर, रुमानियाचे राज्यकर्ते, युगांडाचा इदी अमिन, लिबियाचा गद्दाफी यांनी संविधान न मानता स्वतःची हुकूमशाही प्रस्थापित केली. रशियाचे तहहयात अध्यक्ष पुतीन यांनीही त्यांच्या देशाचे संविधान आपल्या मनाप्रमाणे बदलून घेतले. संविधानात बदल करून पुतीन यांनी स्वतःला आजन्म अध्यक्षपदी राहण्याचा मार्ग मोकळा केला. म्हणजे रशियात निवडणुका वगैरे व्यवस्था मोडीत निघाली. पुतीन हाच कायदा व पुतीन हेच संविधान. भारताचे संविधान बदलून भाजपला पुतीन यांच्याप्रमाणे मोदी यांना भारताचे बादशहा म्हणून नेमणूक करायची आहे काय? म्हणजे मोदी हेच मोदी यांचे कायम उत्तराधिकारी राहतील, अशी भीती ठाकरे गटाने व्यक्त केली आहे. मोदी यांचे आर्थिक सल्लागार विवेक रॉय यांनीही देशाला आता नवे संविधान हवेच असे सांगितले आहे. मोदींचे हे सल्लागार सांगतात, 'आपण कोणताही वादविवाद करतो. तो बहुतांशी संविधानापासून सुरू होतो आणि त्यावरच संपतो. त्यात आता थोडेफार बदल करून चालणार नाही. आपण ड्रॉइंग बोर्डवर परत जाऊन नव्याने सुरुवात केली पाहिजे. राज्यघटनेच्या प्रस्तावनेतील समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य आणि समता या शब्दांना आता काय अर्थ आहे? आपल्याला आता स्वतःसाठी एक नवे संविधान तयार करावे लागेल', असंही अग्रलेखात नमूद करण्यात आले आहे. सामान्यांचे प्रश्न सोडविण्यात मोदींचे सरकार अपयशी ठरले आहे. अपयशावर कोणी बोलू नये म्हणून संविधान बदलले जाईल व बोलणाऱ्यांच्या जिभा कापल्या जातील. संविधानाचा खून करण्याची तयारी सुरू आहे व त्यासाठी ४०० मारेकरी तयार केले जात आहेत. भाजपचा 'चारशे पार'चा नारा ही संविधानाच्या हत्येची तयारी आहे. नव्या संसद भवनाच्या पायरीवर संविधानाचा खून एकदाचा केला की भाजपच्या नव्या संविधान लिखाणाची सुरुवात होईल, अशी भीतीही ठाकरे गटाने व्यक्त केली आहे.

## नैराश्याची सर्वोच्च पातळी उबाठा नेत्यांनी का गाठली ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**उबाठा नेते उद्धवजी ठाकरेंनी परवा भाजपाला भाडखाऊ जनता पार्टी या शब्दांत हिणवले. खरं तर एवढ्या खालच्या पातळीवर जावुन मुख्यमंत्री पदावर बसलेल्या व्यक्तीने राष्ट्रीय पक्षाबाबत असं बोलणं म्हणजे नैराश्याची सर्वोच्च पातळी गाठणं असंच म्हणावे लागेल. ज्या उबाठा गटाचे २०१९ ला डझनावर अधिक खासदार निवडुन आले, ते केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेमुळे. मात्र उद्याच्या होवु घातलेल्या लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात एकही जागा मिळणार नाही. हे त्रिवादी सत्य असताना, शिवाय रोज सहकारी पक्षातुन बाहेर पडत असताना, आणि मुळ शिवसेना आपल्या हातातच नसल्याने उद्धवजींना नैराश्य मानसिकतेने ग्रासले, जसं की समाधानी रहाण्यासाठी काही माणसं आयुष्यभर असमाधानी असतात. पण ते समाधानाच्या शोधात स्वप्नाच्या महालात फिरतात.**

तशीच काही अवस्था सद्या यांची झाल्याचे चित्र असुन ज्या भाजपासोबत २५ वर्षे संसार केला, मग कुणी भाड कुणी खाल्ली ? आणि कशी खाल्ली? याची जाहिर कबुली कोटीच्या चेकद्वारे अनेकजण देवु लागले. सुखाचा संसार चालु असताना केवळ सत्तालोभापोटी घटस्फोट घेवुन हक्काच्या पतीला सोडल्यानंतर होणारी फटफजिती यातुनच आरोपाची आतिषबाजी म्हणावी लागेल. महाराष्ट्राच्या राजकिय हस्तीनापुरात लोकसभेचे महाभारत अद्याप प्रत्यक्ष सुरू झालेलं नसलं तरी काही तासानंतर आचारसंहिता जाहिर होवु शकते. मात्र जागा वाटप असेल किंवा इतर काही उठाठेवी साऱ्याच पक्षात सुरू झालेल्या दिसतात. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी ज्यात उबाठा गट प्रमुखाच्या भूमिकेत आहे. डॉ प्रकाश आंबेडकरांना अद्याप तरी सोबत घेण्यात यश आलं नसुन कदाचित काँग्रेसवालेच त्यांना वंचित ठेवतात की काय? असं चित्र आता डोळ्यासमोर दिसतेय. २४ जागा उबाठा गट लढवणार या आविर्भावात असलेले संजय राऊत आता २० पेक्षा खाली येताना दिसतात. कारण काँग्रेसवाले जास्तीच्या जागा सोडायला तयार नाहीत. शिवाय मुळ शिवसेना दुभंगली ज्याचा परिणाम उबाठा गटावर होणार हा देखील संभाव्य धोका राज्यातील काँग्रेसवाले ओळखुन आहेत. एक गोष्ट खरी आहे की, शरदचंद्रजी पवार आणि उद्धवजी ठाकरे यांची राजकिय अवस्था आणि राजकिय दुःख सद्या तरी समान असल्याचे लक्षात येतं. त्यामुळे कुणी कुठे गेलं तरी मातोश्री आणि सिल्वर बंगला यांना मात्र अंतर्गत एकत्र रहाणे ही आता काळाची गरजच होवुन बसली. कदाचित दोघं मिळून काँग्रेसवाल्याला देखील हात दाखवु शकतील? ते कदाचित लोकसभा निवडणुकीनंतर दिसुन येईल. जागेची घोषणा झाली नसताना मुंबईत अमोल किर्तीकरांची घोषणा उबाठा नेत्यांनी केली ज्यावर काँग्रेस नेते संजय निरूपम यांनी मोठा आक्षेप घेतला. सांगायचं तात्पर्य म्हणजे महाविकास आघाडी अंतर्गत मोठ्या प्रमाणावर संघर्षाने फुगलेली असुन ज्याचे परिणाम निवडणुकीत दिसुन येतील. मागे वळुन पहाताना २०१९ विधानसभा निवडणुका झाल्यानंतर केवळ मुख्यमंत्री पदासाठी उद्धवजी ठाकरेंनी भाजपाला दुर ठेवलं, बारामतीकरांना सोबत



घेवुन राजकिय स्वार्थ साधताना मुख्यमंत्री पद मिळवलं. तदनंतर बरचं रामायण घडलं. एक तर स्व. बाळासाहेब ठाकरेंचं प्रखर हिंदुत्व केवळ खुर्चीसाठी समुद्रात फेकुन दिलं. ज्या गोष्टी त्यांच्याच सहकारी आमदारांना मान्य नव्हत्या, पण हे करत असताना या साऱ्या घडामोडीचं ओझं पुन्हा भाजपाच्या अंगावर टाकुन आम्हीच कसे धुतल्या तांदळासारखे दाखवण्याचा प्रयत्न झाला. काय तर म्हणे देशाचे गृहमंत्री अमितभाई शहा यांनी मातोश्रीवर येवुन बैठकीत मुख्यमंत्री पदाचा शब्द दिला. पण हे सारं खोटे होतं. यांच्या डोळ्यावर महाभारतातल्या घृतराष्ट्रांनी जणु काही स्वार्थाची पट्टी बांधली असंच काही महाभारत घडुन गेलं. कालांतराने त्यांच्यातुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तब्बल ४० आमदार सोबत घेवुन बाहेर पडले आणि १०५ १५ आमदार असलेल्या भाजपासोबत महाराष्ट्राच्या हितासाठी एवढेच नव्हे तर हिंदुत्वाच्या रक्षणासाठी सत्तेत सहभागी झाले. राजकिय उलथापालथीनंतर वर्षा सोडावा लागला आणि पुन्हा उद्धवजी मातोश्रीवर जावुन बसले. तेव्हापासून अनेक खासदार, आमदार दिवसागणिक शिंदे गटात जावु लागले. काल परवा देखील रविंद्र वायकर ठाकरेंना सोडुन गेले. अजुनही काही लोकप्रतिनिधी आचारसंहिता लागण्याच्या अगोदर सत्ताधाऱ्यात जावुन बसु शकतात ? अगोदर म्हटल्याप्रमाणे राजकारणात माणुस नेहमी समाधानाच्या वाटा शोधत असतो. पण स्वकर्माने सतत असमाधानाचीच वाट प्रवासात सापडते. तेव्हा मात्र नैराश्याची सर्वोच्च पातळी गाठल्या जावु शकते. उद्धवजी ठाकरे यांच्या बाबतीत गेल्या काही दिवसापासुन असंच घडतं आहे. भाजपाला तथा व्यक्ती नेतृत्वाला दुसणे देत नको त्या आरोपात शिव्याची लाखोली वाहुन खाली हाताने शिमगा साजरा करताना दिसतात. काल परवा त्यांनी भाजपा नव्हे तर भाडखाऊ पार्टी असा आरोप जाहिर भाषणात केला. खरं तर वैचारिक पातळीवर मोजायचं झालं तर कुठलाही नेता अशा प्रकारचे आरोप आपल्या तोंडुन करू शकत नाही. पण मानसिकताच जर असंतुलित झाली तर मग आपण काय बोलतो? कुणावर बोलतो? याचे भान रहात नाही. त्यांना एक सवाल विचारायला हवा की ज्यांना तुम्ही भाडखाऊ म्हणता? त्यांच्याचसोबत २५-३० वर्षे तुमचा संसार सुखाचा होता. १९९५ला सत्तेत सहभाग होता. तिथपासुन २०१४ ला देखील सोबतच होतात. मग भाड कुणी खाल्ली ? आणि किती खाल्ली? हा हिशोब सांगायला नको. कसं आहे? घरचे वासे फिरले की, घरच फिरतं? एका मंत्र्यानं परवा धाराशिवच्या जाहिर सभेत खासदारकीची उमेदवारी मिळवुन देण्यासाठी दहा कोटी रूपये चेक दिल्याचं सांगितलं. मग ही भाड कशाचं द्वेतक म्हणावे लागेल तर खाऊ कोण? याचं देखील संशोधन करायला हवं. वर्षानुवर्षे सुखाचा संसार सोबत करायचा, घटस्फोट झाल्यानंतर मग पहिल्या पतीच्या नावाने बोटं मोडत बसायचं अशीच परिस्थिती सद्या यांच्याबाबत येवुन ठेपली. खरं तर भारतीय जनता पार्टी हा वैचारिक विचारधारा असलेला सुसंस्कृत पक्ष म्हणुन ओळखल्या जातो. तुम्ही भाडखाऊ म्हणाले पण पक्षानं एकाही शब्दांत अधिकृत तुम्हाला उत्तर दिलं नाही. कारण यांचे संस्कार आणि तुमच्या संस्कारात कमालीचा बदल आहेचना, तुमचे संजय कंबराखालची भाषा नेहमीच बोलतात. ज्याचा महाराष्ट्रातील सुजाण नागरिकांना वैतागच आलेला आहे. उबाठा नेत्यांनी देखील अगदी उपमुख्यमंत्र्याला फडतुस इथपासुन अनेक शब्दांत हेळसांड केलेली आहे. तरी देखील कधीच भाजपाने उत्तर दिलेलं नाही. खरं तर दुध का दुध पानी का पानी होण्याची वेळ आता खऱ्या अर्थाने आली असुन भाजपाची साथ सोडल्याचे परिणाम उद्याच्या लोकसभेच्या निवडणुका झाल्यानंतर तुम्हाला निश्चित भोगावे लागतील तेव्हा मात्र पश्चाताप झाल्याशिवाय रहाणार नाही. कारण आज तरी राज्यात उबाठा गटाला एखादी तरी जागा लोकसभेची मिळेल असा अंदाज लावणे कठीणच वाटते. कदाचित शिंदे गटाच्या जागा तुमच्यापेक्षा चार जास्तच राहतील. मग याहून अधिक मानसिकता लकव्यासारखी निश्चित होवुन बसु शकते. बाकी काही असलं तरी ज्यांच्यासोबत संसार केला, सुखाचा होता तेव्हा तुम्हीच आमचे धनी आणि घटस्फोट झाल्यानंतर तुम्ही भाडखाऊ ही कोणती रित? हेच सांगा उद्धवजी.

## देवाला इतरत्र शोधण्याची आवश्यकता नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपल्या चांगल्या कर्मात देव असतो आपण सत्कर्म केलं तर देव इतरत्र कुठेही शोधण्याची आवश्यकता भासणार नाही.दैनंदिन जीवनात आपण आपलं प्रत्येक कर्म करताना योग्य काळजी दक्षता घेतली सतर्क रहिलोत तर आपल्या मुळे इतर कोणालाही कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही.आपला कोणालाही त्रास होऊ नये हेच सगळ्यात उत्कृष्ट कर्म आहे.सत्कर्म,सत्यनिष्ठ आचरण,कर्मात देवत्व निर्माण केले तर इतरत्र जगाच्या पाठीवर कुठेही आपल्याला देव शोधण्याची गरज भासणार नाही.देव शोधण्याची प्रत्येकाची पद्धत हि वेग वेगळी असली तरीही देवाचा शोध नाही असं फार कोणी सापडणार नाही. सृष्टी वर देव आहे नाही हे माहित नाही पण चांगल्या कर्मात देव नक्कीच आहे.म्हणून चांगलं कर्म करा देव शोधण्याची गरज पडणार नाही.**

देव आहे कि नाही मग आहे तर कुठं आहे नाही तर कसा नाही.यावर प्रत्येकाचं मत व्यक्तिपरत्वे वेगवेगळ असत त्यावर अनेक मतमतांतरे आहेत. पण आपण दैनंदिन जे नित्य कर्म करतोय हे कर्म जर सात्विक,सत्यनिष्ठ, आणि इतर कोणत्याही जीवला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही असं असेल तर त्या कर्मा मध्ये ईशवाराच रूप आहे.आपण आपल्या कर्मा मध्ये ईशवाराच रूप शोधण्याऐवजी इतरत्र ठिकाणी भटकंती करतो. तुज आहे तुज पाशी परी तु जागा चुकलाशी अशीच कहिशी आपली अवस्था होते.देव शोधुन सापडायला तो काही बाजारातील भाजीपाला नाही. कि आपण बाजारात गेलो पैसे दिले आणि देव खरेदी केला असं कल्पनेत सुद्धा शक्य नाही. मुळात आपण कोणतीही बाब गोष्ट समजून किती व्यवस्थित घेतोय त्यानुसार त्याचा अंतिम अर्थ निष्कर्ष आपल्याला सापडतो.मुळात देवाच्या अस्तित्वाचा प्रश्न सोडवत बसण्या ऐवजी अथवा इतरत्र देवाचा शोध घेत बसण्या ऐवजी आपलं कर्म असं करा कि आपल्याला देव कुठेही शोधण्याची आवश्यकता भासली नाही पाहिजे. धर्म पंथ तत्त्व तत्त्वज्ञान हे कोणतंही असलं तरी ते ईश्वरीय शक्तिच्या परिघातच फिरत.मुळ ज्ञान तत्वज्ञान याला आपण बगल देऊन आपल्या सोयीनुसार वापरतो.इथंच खरा छेद मिळतो.धर्म संस्कार संस्कृती शास्त्र हे सत्यनिष्ठच असतात. पण आपल्याला त्याचा योग्य अर्थ सापडत नाही. महणुन आपण चुकीचा अर्थ घेऊन योग्य मार्ग शोधतो.म्हणजे आपला शोध आणि बोध किती कल्पनिय आहे. दैनंदिन आपण अनेक कर्म करतो अथवा ती आपल्याला दैनंदिन जीवन व्यथित करण्यासाठीच करावी लागतात कर्म कोणालाही चुकतं नाही मग हेच कर्म करताना आपण जो मार्ग अंवलबतो तो मार्ग महत्वाचा असतो . मुळात हा मार्ग जर योग्य सापडला शोधता आला तर आपल्या सगळ्या अडचणी समस्या संपुष्टात येतात आणि मार्ग चुकला तर दिशा चुकते आणि आपण भटकंती करतो.हिच भटकंती आपल्याला अनेक ठिकाणी घेऊन जाते.मुळात कर्मात देव आहे हे सुरवातीला समजलं तर पुढील भटकंती होणार नाही.आपण सुरवातीला समजुन घेत नाहीत म्हणून शेवटपर्यंत आपल्याला भटकत राहव लागत सुरुवात चुकली तर शेवट बरोबर कसा येईल म्हणून विचार पुर्वक कर्म केले तर आपल्याला काहिच अडचण उद्भवत नाही अथवा इतरत्र कुठेही देव शोधत बसण्याची आवश्यकता नाही.पण अस न करता आपण इतरांच अनुकरण करण्याचा प्रयत्न करतो इतरांच अनुकरण मग ते कसं आहे कोणत्या मार्गवर आहे ते सत्यनिष्ठ आहे कि असत्य आहे हे तपासण्याची तसदी सुद्धा आपण घेत नाही.मुळात मानव हा अनुकरणीय असल्याने आपण आपल्या स्वतःच्या विश्वासावर ठाम न राहता इतरांच कर्म पाहुण अनुकरण करतो.आणि तेही जास्तीत जास्त वाईट कर्म तर खुप लवकर अनुकरण करतो.चांगलं कर्म सात्विक कर्म हे थोडस कठिण जात म्हणून आपण त्या कडे जास्ती जास्त दुर्लक्ष करतो आणि वाईट कर्मा कडे आकर्षित होतो . आणि मग क्षमायचना करण्यासाठी पुन्हा मंदिर शोधून देवा समोर क्षमायाचना करतो . काही प्रमाणात आपण देवाला सुद्धा प्रलोभन देण्याचा यशस्वी प्रयत्न करतो.आणि खोटं खोटं क्षणिक समाधान शोधतो.या सगळ्या घडामोडी भोवती आपलं सगळं आयुष्य चक्र फिरत राहतं.मुळात कर्म सात्विक सत्यनिष्ठ करा आपल्या कार्यात देवत्व निर्माण होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# उपचारादरम्यान बारा वर्षीय शाळकरी मुलीचा मृत्यू

## राजूर येथील दुर्दैवी घटना : नातेवाईकांकडून हॉस्पिटलची तोडफोड

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथील टेंभुर्णी रोडवरील खरात हॉस्पिटलमध्ये उपचारदरम्यान तपोवन येथील तुळशीराम नाईक तांड्यावरील बारा वर्षीय शाळकरी मुलीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.दिशा प्रेमचंद चव्हाण (12) असे मयत मुलीचे नाव आहे. डॉक्टरांच्या चुकीच्या उपचार पद्धतीमुळे मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप करत संतप्त नातेवाईकांनी दवाखान्याची मोठ्या प्रमाणात तोडफोड केली.ही घटना 11मार्च रोजी दुपारी तीनच्या दरम्यान घडल्याचे समजते.या घटनेबाबत सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागातील आरोग्याविषयीचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



सविस्तर माहिती अशी की 11 मार्च रोजी सकाळी तुपेवाडी जवळील तुळशीराम नाईक तांडा येथील दिशा प्रेमचंद चव्हाण (12) ही मुलगी आपल्या वडिलांसोबत राजूर येथील खरात हॉस्पिटलमध्ये उपचारासाठीआली होती. डॉ.खरात यांनी दिशावर उपचार केल्यानंतर घरी जाण्याची परवानगी दिली. परंतु घरी आल्यानंतर दोन तासांनी दिशाची तब्येत पुन्हा बिघडली.वडिल दिशाला घेऊन तात्काळ खरात हॉस्पिटलमध्ये गेले.दिशाची तब्येत जास्तच खालावल्याचे डॉक्टरांच्या लक्षात येताच त्यांनी मुलीस राजूर येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्याचे सांगितले. राजूर ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी तपासणी करून दिशाला तात्काळ जालना येथे हलविण्याचा सल्ला दिला. नातेवाईकांनी रुग्णवाहिकेच्या मदतीने जालना रुग्णालय गाठले. परंतु तपासणी नंतर डॉक्टरांनी दिशास मृत घोषित केले.हे ऐकून दिशाच्या वडिलांना मोठा धक्का बसला. नातेवाईकांनी मृतदेहासह रुग्णवाहिका परत राजूर येथील खरात हॉस्पिटलमध्ये आणून डॉक्टरांना जाब विचारण्यास सुरुवात केली.भावना अनावर झालेल्या नातेवाईकांनी हॉस्पिटलची तोडफोड करत कारवाईची करण्याची मागणी केली.चुकीच्या उपचार पद्धतीमुळे दिशाचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला.हॉस्पिटल समोर काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.मृतदेह ताब्यात घेण्यास नातेवाईकांनी नकार दिला होता. सदरील घटनेची माहिती मिळताच हसनाबद पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संजय आहिरे आपल्या सहकाऱ्यांसह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व परिस्थिती नियंत्रणात आणली.पोलीस अधिकारी व गावातील नागरिकांच्या समजुतीनंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास होकार दिला. सायंकाळी उशिरा तुळशीराम नाईक तांडा येथे दिशावर अंत्यसंस्कार करण्यात आले.अंत्यविधीस उपस्थित नातेवाईकांच्या भावना अनावर झाल्या होत्या.या घटनेबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

पोटची लेक गेल्याने दिशाच्या आईला दुःख अनावर झाले होते.हॉस्पिटलमध्ये येताच तिने एकदम हंबरडा फोडला. थोडा वेळ ती बेशुद्धही झाली होती.त्यावेळी वातावरण भावुक झाले होते.माझी मुलगी मला परत आणून द्या अशी केविलवाणी विनवणी करत होती. नातेवाईक दिशाच्या आईची समजूत काढून शांत करण्याचा प्रयत्न करत होते. अशी वेळ कुणावरही येऊ नये अशी चर्चा हॉस्पिटल समोर जमलेला समुदाय आपापसात करत होता.



## खा. पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांच्या हस्ते अहिल्यादेवी कुंड साऊंड अँड लेझर शोचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांच्या विशेष प्रयत्नातून वेरूळ येथे बेसिल या सार्वजनिक उद्योग आस्थापनेच्या व्यावसायिक सामाजिक निधीतून तून आठ कोटी रुपये खर्च करून,वेरूळ येथील पुण्यश्लोकअहिल्याबाई होळकर शिवालय तीर्थ कुंडयेथे सुशोभिकरण येथे लेझर आणि साऊंड शो चा लोकार्पण सोहळा पद्मश्री माजी राज्यसभा खासदार डॉ.विकास महात्मे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

यावेळी आमदार प्रशांत बंब,भारतीय जनता पार्टीचे ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष संजयजी खंबायते, तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण, तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, राजेंद्र कौशिकी,जिल्हा परिषद उपाध्यक्ष एल.जी. गायकवाड, बेसिलचे उपमहाव्यवस्थापक दीपक तिवारी विधानसभा विस्तारक विकास कापसे,सुनील जोशी, धनगर समाजाचे प्रदेशाध्यक्ष अनंत बनसोडे,धनगर समाजाचे मराठवाड्याचे अध्यक्ष अरुण रोडगे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे धनगर समाजाचे जिल्ह्याचे अध्यक्ष ज्ञानेश्वर आदमाने, घृष्णेश्वर मंदिराचे राजेंद्र कौशिके,वेरूळ येथीलग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते,

आमदार प्रशांत बंब असे प्रतिपादन केलेकी,विकासाच्या जोडीला संस्कार आणि महापुरुषाचा वारसा हा अत्यंत महत्वपूर्ण आहे. सती प्रथेला झुगारून दिले. एक महिला काय करू शकते हे पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी करून दाखविले. डॉ कराड साहेबांनी जिल्ह्यात मोठे विकास कामे केली आहेत, असे आमदार प्रशांत बंब यांनी म्हंटले आहे. कायगाव टोका येथील बारव आहे त्याच्या विकासासाठी रू.25 लाख रुपयांचा निधी देईल अशी घोषणा देखील आमदार प्रशांत बंब यांनी केली. पद्मश्री खासदार विकास महात्मे यांनी या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी असे प्रतिपादन केले की,महिलाच्या उद्धारासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी मोठे काम केले आहेत.धनगर समाजाच्या विकासाची साठी रू.१००० कोटी रुपयांची विविध योजना सुरू आहेत.धनगर समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सरकारने मोठा निधी दिला आहे.महिला सशक्तिकरण,शिक्षण ,आणि विधवा महिला यांना दत्तक घेणे यासारखे असंख्य सामाजिक विकासाचे कामे सर्वप्रथम अहिल्यादेवी यांनी केले. देशातील अर्थव्यवस्था पाच क्रमांकावर आहे.डॉ.कराड यांनी महत्वाचे काम केले आहे. राज्यमंत्री डॉक्टर कराड यांनी यावेळी असे प्रतिपादन केले की,अहिल्याबाई होळकर या शुर आणि धाडसी तर होत्याच परंतु हिंदू धर्माच्या विकासासाठी त्यांनी आध्यात्मिक क्षेत्रामध्ये भरीव काम केले आहे.वेरूळ येथील ज्योतिर्लिंग आणि कुंड याचा जीर्णोद्धार केला आहे. अत्यंत चांगला आणि ऐतिहासिक माहिती देणारा साऊंड लाईट शो या ठिकाणी बसवण्यात आलेला आहे. संभाजीनगर हे पर्यटनाची देशातील राजधानी आहेत त्या अनुषंगाने नाईट टुरिझम विकसित करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. जागतिक पर्यटन स्थळ असलेल्या वेरूळ येथे वेरूळ येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी शिवालय तीर्थ कुंड नूतनीकरण आणि नागरिकांना इतिहासाची माहिती व्हावी या दृष्टीने लाईट आणि साऊंड शो हा महत्वपूर्ण राहणार आहे. असे डॉ. कराड यांनी यावेळी सांगितले. समारोप प्रसंगी अरुण सागर यांनी आभार व्यक्त केले.

## स्नेहयोग महिला मंडळात जागतिक महिलादिन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सिडकोच्या एन -४ परिसरातील स्नेहयोग महिला मंडळात जागतिक महिलादिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

गणेश वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ मुग्धा कुळकर्णी यांना श्रीफळ, शाल देऊन सत्कार करण्यात आला. योग शिक्षीका संध्या परदेशी यांचाही शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. सहशिक्षिका सुहासिनी पुंड यांना चांदीचे जोडवे देऊन संध्या परदेशी यांनी सत्कार केला. त्यानंतर कार्यक्रमात महिलांनी कविता सादर केल्या. तर काहीनी नृत्य सादर केले. संध्या परदेशी, पुंड, सोनकुसरे, खडसे, दाणेकर, चौव्हान पवार, पाठक यांनी कार्यक्रमासाठी विशेष योगदान दिले. सर्व महिलांना सोनचाफा फुल, आसन गिफ्ट देण्यात आले. शेवटी अल्पोपहार चहा देऊन आभार प्रदर्शाने कार्यक्रमाची सांगता झाली.



## चला मतदान करुया, उज्वल भविष्य घडवू या

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** नगर परिषद वैजापूर दीनदयाळ अंत्योदय योजना –राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी (भा.प्र.से.) तसेच मुख्याधिकारी भागवत बिघोत नगर परिषद वैजापूर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व महिलांसाठी आज दिनांक 12 मार्च रोजी मतदान जनजागृती करण्यात आली.चला मतदान करुया ,उज्वल भविष्य घडवू या याचा संकल्प करून सर्व महिलांनी नारा दिला व येणाऱ्या निवडणुकीत सर्व महिलांनी मतदान करून देश सक्षम करण्याचा प्रयत्न करुया आशी शपथ सर्व महिलांनी घेतली. या कार्यक्रमासाठी सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी महिलांना मतदान जागृती बद्दल मार्गदर्शन केले.जागतिक महिला दिनानिम्मित यशदा चे शरद पाठोळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन समुदाय संघटक दिवाकर त्रिभुवन, सूर्यकांता काकडे, अमीन पठाण यांनी केले तसेच सोनचीरेया उपजीविका केंद्र वैजापूरच्या अध्यक्षा चित्रा थोरात, सचिव जयश्री सोनवणे कोषाध्यक्ष ललिता देशमुख उपस्थित होत्या व याप्रसंगी शहरातील महिलांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी आभारप्रदर्शन वैशाली माथाडे यांनी केले.



## चार दशकांनंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुधीर कोर्टीकर**

**छत्रपती संभाजीनगर :** पूर्णा जंक्शन येथील अभिनव विद्या विहार प्रशालेच्या विद्यार्थ्यांचवा स्नेह मेळावा छत्रपती संभाजीनगरमधील सागर रिसोर्ट येथे उत्साहात संपन्न झाला.जवळजवळ चार दशकाहून अधिक काळानंतर भेटलेल्या आपल्या मित्र-मैत्रिणींना पाहून साऱ्यांचा आनंद गगनात मामेनासा झालेला होता. आपण नक्की कोणत्या आठवणींची उकल करावी काय बोलावं हेही समजत नव्हतं.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पूर्णा येथील श्री भगवान कुरे व सौ सुलभा कुर्रे या दांपत्याचा पुष्पगुच्छ देऊन गोपालजी अजमेरा यांच्या हस्ते मान सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला 45 वर्षानंतर भेटलेले सर्व मित्र मैत्रिणी यांनी आपला एकमेकांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या



सुरुवातीला अनिता खेरडे ( शहाणे ) यांनी सुंदर प्रार्थना म्हटली. त्यानंतर अनिता खेरडे यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. मंजू दातार तिने सुंदर नृत्य सादर केले .पुष्पा कोकीळ तिने आधी लावणी नंतर एक मराठी गाण्यावर नृत्य सादर केले .मृदुला वझे हिने एक सुंदर गजल गायली .शोभा दाते एक मराठी गीत सुंदर रीतीने सादर केले. तर सुलभा कुर्हे, अंजली खेर्डे, अनिता बेर्डे या विद्यार्थीनींनी मराठी..हिंदी गाणी सुंदर रितीने सादर केली.गोपालजी अजमेरा यांच्या नातीनींही सुंदर नृत्य सादर करून साऱ्यांनाच मंत्रमुग्ध केले.आपल्या नातींच्या बरोबर गोपल अजमेरा व त्यांच्या सुविद्य पत्नीनीही सुरेख नृत्यसादर केले. दुपारी गोपालजी अजमेरा यांच्या सागर रिसोर्ट मध्ये स्नेहमेळाव्यास जमलेल्या सर्वच मुलां.. मुलींसाठी अतिशय स्वादिष्ट हापूस आमरसाच्या भोजनाची सुरेख व्यवस्था केलेलीहोती.कांदाभजी कुरडया.. पापड ..लोणचं.. चवदार भाज्या.. जेवणाच्या व्यवस्थेवर सारेजण खुष होऊन गेले. दुपारच्या सत्रात पुन्हा काही मुलां.. मुलींनी सुरेख गाणी गायली.. काही विद्यार्थीनींनी छान नृत्यांचे सादरीकरण करुन साऱ्यांनाच मंत्रमुग्ध केले.काही जणींनी तर चक्क लावणीवर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली... दुपारी चहा कॉफी नी रंगत वाढतच गेली... चाळीस वर्षां नंतर भेटलेल्या मुलां मुलींनी आपणं एकमेकांना काय काय सांगावे असतेच काहीसे होवून गेले होते हे बाकी खरं... अनेक मुलां मुलींनी एक मेकांचे वॉटसॉपचे नंबर शेअर केले.पुढील गेट टुगेदर हे आपल्या शाळेत पूर्णेतच व्हावे असे गोपालजी अजमेरा यांना सांगितले... शेवटी हातं उंचावून एकमेकांना बाय.. बाय.. करीत या अवर्णनीय स्नेहमेळ्याची सांगता झाली.

# सहकारी संस्था संदर्भातील अध्यादेश सरकारने रद्द करावा : वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** अंतरिम अर्थसंकल्पीय अधिवेशनात सहकारी संस्था अधिनियम, 1960 मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महायुती सरकारने विधेयक आणले होते. या विधेयकाला आम्ही कडाडून विरोध केला होता. आता सरकारने यासंदर्भात अध्यादेश काढला आहे. सरकारने अध्यादेशाव्दारे सहकारी कायद्यात केलेली तरतूद बेकायदेशीर, सहकारी संस्थांमध्ये असमानता निर्माण करणारी आणि सत्तारुढ पक्षाच्या आमदारांवरील अविश्वास ठरावाची कार्यवाही रोखण्यासाठी केली आहे. सरकारचा कारभार संविधान, कायदा, नियम यानुसार चालत नसून हुकुमशाही पध्दतीने चालतो आहे. त्यामुळे सरकारच्या निर्णयाचा धिक्कार श्री. वडेट्टीवार यांनी केला आहे.

सरकारला संविधान आणि कायद्याची थोडी जरी चाड असेल तर सरकारने हा अध्यादेश रद्द करावा, पुढील अधिवेशनात संसदीय कार्यप्रणालीनुसार हे विधेयक सभागृहासमोर आणावे व या विधेयकाचा निर्णय कायदे मंडळाला करु द्यावा, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. वडेट्टीवार म्हणाले की, सहकारी संस्थांमधील पदाधिकाऱ्यांना काम करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा, यासाठी सहा महिन्यांऐवजी दोन वर्षांनंतर अविश्वास ठराव आणण्यासाठी राज्य सरकारने मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात सहकारी संस्था अधिनियम, 1960 मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक आणले होते. हे विधेयक राजकीय हेतूने प्रेरित आहे. सत्तारुढ पक्षाच्या काही आमदारांवरील अविश्वास ठरावाची कार्यवाही रोखण्यासाठी हे विधेयक आणले होते. त्यामुळे विधानसभेत आम्ही या विधेयकाला कडाडून विरोध केला होता. तरी देखील सरकारने पाशवी बहुमताच्या जोरावर हे विधेयक विधानसभेत मंजूर करुन घेतले. विधानपरिषदेतही या विधेयकाला विरोधी पक्षाने कडाडून विरोध केला. हे विधेयक नामंजूर होण्याच्या भितीने सरकारने अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी हे विधेयक घेतले होते. अंतरिम अर्थसंकल्पीय अधिवेशनात हे विधेयक मंजूर करुन घेण्यात सरकारला अपयश आले. आता अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सांगता होऊन 15 दिवसांचा कालावधी देखील लोटला नाही. तोच सरकारने मागच्या दाराने अध्यादेश काढला आहे. नामंजूर झालेल्या विधेयकातील सहा महिन्यांऐवजी दोन वर्षांनंतर अविश्वास ठराव आणणारी तरतूद जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्ष-उपाध्यक्षांना लागू केली आहे. मात्र, इतर सहकारी संस्थांच्या बाबतीत सहा महिन्यांची तरतूद कायम ठेवली आहे. हा निर्णय सरकारने मागे घ्यावा, अशी मागणी वडेट्टीवार यांनी सरकारकडे केली आहे.

# पळसखेडा येथे दोन गटात तुंबळ भांडण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** पळसखेडा हे फर्दापूर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या पळसखेडा येथे दोन गटात तुंबळ हाणामारी झाली असून यात परस्परांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले. पळसखेडा येथे एका गटाने दुसऱ्या गटातील मुलगी पळवून नेवून लग्न लावून घेतले म्हणून सोमवारी यांच्या परस्परांमध्ये तुंबळ हाणामारी झाली असून यातील दोन्ही गटातील महिला पुरुष जखमी झाले. याकरिता फर्दापूर पोलिस स्टेशन मध्ये दोन्ही गटावर गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील दोन्ही गटातील आरोपींचे नावे राहुल सोनवणे, पवन सोनवणे, संजय सोनवणे, दत्तू सोनवणे, संतोष सोनवणे, प्रकाश काळे, कौशाबाई सोनवणे, प्रमिला सोनवणे, सरिता सोनावणे, उजा काळे, दुसरा गट ज्ञानेश्वर उघडे, राजू उघडे, रंजना उघडे, पुजा उघडे लक्ष्मी उघडे, संतोष गर्दे, मंगलाबाई गर्दे, उमेश गर्दे राणी गर्दे, गोकूळ सुपनर, स्पाली सुपनर सुमनबाई उघडे या सर्व जणांवर परस्परांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून सहा पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सुग्रीव चाटे पोलिस कर्मचारी निलेश लोखंडे, मिरखा तडवी हे तपास करीत.

# कुणबी मराठा महासंघाच्या नेवासा तालुकाध्यक्षपदी भरत बेल्हेकर

आधुनिक केसरी न्यूज



**सोनई :** अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाच्या वतीने उत्तर नगर जिल्हयातील पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप नेवासा येथे झालेल्या पदग्रहण सोहळयात करण्यात आले. कुणबी मराठा महासंघाच्या नेवासा तालुकाध्यक्षपदी बेल्हेकरवाडी येथील आदर्श सरपंच भरत बेल्हेकर यांची निवड करण्यात आली.तालुका उपाध्यक्षपदी बद्रीभाऊ चिंधे, शहर प्रमुख पदी अनिल निमसे यांची निवड उत्तर नगर जिल्हाअध्यक्ष अनिल ताके पाटील यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आली.

नेवासा येथील हॉटेल प्रणाम च्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नेवासा वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड. अशोकराव करडक हे होते. तर अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रल्हाद गुळभिले,राज्य प्रवक्ते प्रा.चंद्रसेन कोठावळे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप पोटे, महिला आघाडीच्या पुणे जिल्हा अध्यक्ष सौ. सपनाताई कदम, सचिव जी.के. गाडेकर,मराठवाडा विभाग अध्यक्ष डॉ. रंगनाथ काळे, संस्थापक कार्याध्यक्ष सतीश पवार,नगर उत्तर जिल्हाध्यक्ष अनिल पाटील ताके, अरुणराव काकडे, महिला आघाडी उत्तर नगर जिल्हाध्यक्ष सौ.नीता हासे, महिला आघाडी कार्याध्यक्षा उज्वलाताई शिंदे, नेवासा तालुका अध्यक्ष भारत बेल्हेकर,तालुका उपाध्यक्ष बद्रीनाथ चिंधे पाटील, नेवासा शहराध्यक्ष ॲड. संदीप शिंदे, प्राचार्य नितीन धस सर, पत्रकार संदिप दरंदले यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी जिजाऊ वंदना गाण्यात येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा सौ.नीलिमाताई वाबळे,महिला आघाडी शहराध्यक्ष सौ.जयश्रीताई शिंदे यांनी औक्षण करून आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले. तर नवनिर्वाचित उत्तर जिल्हाध्यक्ष अनिल ताके पाटील यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात कुणबी मराठा समाजाच्या न्याय हक्कांसाठी आम्ही सर्वजण एकत्रित आलो असून आता समाज बांधवांमध्ये जनजागृती करण्यासाठी खेडोपाडी शाखा काढण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी नेवासा श्रीरामपूर, संगमनेर, कोपरगाव, राहाता, अकोले तालुक्यातून आलेल्या पुरुष, युवक व महिला नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शाल बुके व नियुक्ती पत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. नेवासा शहराध्यक्ष ॲड. संदीप शिंदे यांनी अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाच्या वतीने आपल्याला न्याय हक्कासाठी लढा उभारायचा असल्याने पदाधिकाऱ्यांनी जबाबदारी समजून महासंघाकडून आलेल्या सूचनांनुसार काम करावे असे आवाहन यावेळी बोलताना केले. सूत्रसंचालन सुधीर चव्हाण यांनी केले तर कुणबी मराठा महासंघाच्या नेवासा शहर महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ.जयश्रीताई शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा या राज्य गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. पदग्रहण कार्यक्रमाला उत्तर नगर जिल्ह्यातील पुरुष, युवक व महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# प्रशिक्षणचे आयोजन; शेतकऱ्यांत जागृती

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे सोबलगाव येथे तालुका कृषी विभागा अंतर्गत गटांतील शेतकऱ्यांना शेती पुरक सविस्तर मार्गदर्शन माहिती देवून जागृत करण्यात आले. दिनांक ११ रोजी सोमवारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय खुलताबाद यांच्या मार्फत डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत गाव पातळीवर पहिले प्रशिक्षण कार्यक्रम मौजे सोबलगाव एक गटातील शेतकरयांनसाठी आयोजन करण्यात आले होते.गटातील उपस्थित शेतकऱ्यांना योजनेची संपूर्ण माहिती व तसेच पहिल्या वर्ष अनिवार्य बाबी उपक्रम बद्दल मार्गदर्शन एस.ए. गायकवाड यांनी केले. शेतकऱ्यांना उत्पादक कंपनीची स्थापना करण्यात आलेल्या कागदपत्राची व कंपनी स्थापना ची माहिती यांनी दिली माती परीक्षण व पारंपारिक सेंद्रिय शेती आत्मा योजनेची माहिती भगवान सूरासे यांनी दिली कृषी सहायक डी.बी. हिंगे या कृषी विभागातील इतर योजनेची माहिती देऊन मार्गदर्शन केले .यासाठी मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते. प्रवीण साळुंके , कचरू आघाडी, सकाहारी बनसोड, बाबासाहेब गायकवाड. बाळू आघाडे, शेतकरी महिला जया आघाडे, नंदा आघाडे, मीरा बनसोड, मीरा मालोदे, संगीता बोरसे, वैशाली बनसोड, तारा बनसोड, आदि शेतकरी उपस्थित होते.

# अब्दुल सत्तार यांच्या लोकनायक पुरस्काराचे सभापती चव्हाण यांनी केले कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** मंत्री ना. अब्दुल सत्तार यांचा आनंद आखाडा त्र्यंबकेश्वेर नाशिक, शिवशारदा शिक्षण प्रसारक मंडळ, तसेच म तदारसंघातील देवस्थानांचे संत-महंत यांच्यावतीने लोकनायक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी त्यांचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या कार्याची दखल घेत सिल्लोड येथे सेवानिवृत्त प्राचार्य नामदेवराव चापे यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त आयोजित संगीतमय श्रीराम कथा सोहळा प्रसंगी मंत्री अब्दुल सत्तार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अब्दुल सत्तार यांनी आपल्या सिल्लोड- सोयगाव मतदारसंघातील श्री क्षेत्र मुर्डेश्वर संस्थानच्या विकासासाठी ४५ कोटींच्या प्रस्तावाला मंजुरी मिळवून दिली. त्यासोबतच धोत्रा येथील सिद्धेश्वर देवस्थान साठी ५ कोटी तर मतदारसंघातील आमसरी, इंद्रगढी, सायंबा महाराज देवस्थान, भैरवनाथ देवस्थान, तसेच भांगशी माता गढ़, संत कबीर मठ, शेलगाव या देवस्थानाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला. शिवस्मारक, भीमपार्क उभारण्याच्या महत्वकांक्षी प्रकल्पाला मंजुरी आणि निधी आणत विविध तीर्थ क्षेत्राच्या विकासासाठीही पुढाकार घेतला आहे. प्रमुख देवस्थान व शिवशारदा शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने त्यांना साधू संत महंतांच्या हस्ते लोकनायक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यापूर्वी ही दि. २७ मार्च २०२२ रोजी अखिल भारतीय आखाडा परिषद व देवस्थान यांच्यावतीने साधू संतांच्या हस्ते अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांना जननायक पुरस्कार देण्यात आल्याने माजी सभापती चव्हाण यांनी त्यांचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या.

# गोंडवाना विद्यापीठात महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-20 क्रिकेट स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडवाना :** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेचे आयोजन दि. 11 ते 17 मार्च 2024 या कालावधीत करण्यात आले आहे. सदर कुलगुरू चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन विदर्भसंघ, माजी रणजी क्रिकेटपटू रामेश्वर सोनुने यांच्या हस्ते पार पडले. या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. अनिता लोखंडे, वित्त व लेखा अधिकारी भास्कर पठारे, सुभाष पवार, सतीश पडोळे, दिपक घोणे, डॉ. क्रिष्णा कारु, डॉ. प्रशांत ठाकरे आदी उपस्थित होते. यावेळी उद्घाटनपर सामना गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या दोन संघात खेळविण्यात आला. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेमध्ये गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, मुंबई विद्यापीठ मुंबई, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ लोणेरे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी आदी विद्यापीठातील कर्मचारी या कुलगुरू चषकामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाले आहे.



# ठाकरे सेनेकडून लोकसभेसोबतच विधानसभेची बांधणी

## ठाकरे घराण्याशी एकनिष्ठ कट्टर शिवसैनिक विलास व्हटकर यांच्या गळ्यात विधानसभेची माळ ?

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जनसंवाद यात्रेनिमित्त शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी (दि.७)उमरगा-लोहारा विधानसभा मतदार संघात झंझावाती दौरा करत जाहीर सभा घेऊन शिवसैनिकात नवचैतन्य निर्माण केले. उमरगा येथील कै. शिवाजीराव मोरे क्रीडा संकुल येथे झालेल्या जाहीर सभेला मोठ्याप्रमाणात शिवसैनिकांचा जनसागर उसळला होता. गावागावातून शिवसैनिक मोठ्या संख्येने सभेला उपस्थित होते. गद्दारी करून येथील आमदार गेलेला असला तरी पुन्हा नव्या दमाने या ठिकाणी सामान्य, एकनिष्ठ शिवसैनिकला आमदार करू आणि विधानसभेवर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा फडकवू त्यासाठी शिवसैनिकांनी तयार राहावे असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. यावेळी विलास व्हटकर यांनी व्यासपीठावरून उपस्थितांना हात जोडून नमस्कार केला त्यावेळी शिवसैनिक निष्ठावंत शिवसैनिक म्हणून विलास व्हटकर यांच्यासाठी घोषणा देत होते. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या उमरगा-लोहारा विधानसभा मतदार संघातून गुंजोटीचे माजी सरपंच तथा



१९९० पासून एकनिष्ठपणे काम करणारे निष्ठावंत शिवसैनिक विलास शरणप्पा व्हटकर यांना ठाकरे सेनेकडून बळ मिळेल का? असा प्रश्न जनतेतून उपस्थित केला जात आहे. विलास व्हटकर यांचा उमरगा-लोहारा विधानसभा मतदार संघात चांगला जनसंपर्क आहे. अनेक गावांत शिवसेनेच्या शाखा स्थापन करण्यात त्यांचा महत्वाचा वाटा आहे. गुंजोटीचे शाखाप्रमुख म्हणून जनतेची केलेली कामे यामुळे ते उमरगा तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत अशी ओळख असणाऱ्या गुंजोटी गावचे २००५ साली शिवसेनेचे पाहिले सरपंच झाले. त्यांच्या कार्याच्या माध्यमातून पुढे त्यांच्या भावजयी सौ. क्रांतीताई किशोर व्हटकर या २०१७ साली गुंजोटी गणातून सर्वाधिक मताधिक्य घेऊन पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आल्या. पक्षनिष्ठेला प्राधान्य देणारे, गेल्या तीन टर्मपासून विधानसभेला इच्छुक असणारे विलास व्हटकर यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी शिवसैनिकातून जोर धरू लागली आहे. त्यामुळे आगामी उमरगा-लोहारा विधानसभेसाठी विलास व्हटकर यांना उद्धव ठाकरे सेनेकडून बळ मिळेल का अशी चर्चा जनतेतून होत आहे. शिवसैनिकांशी नाळ जोडून असणारे, त्यांच्या अडचणीला धावून जाणे, सर्वसामान्यांना विविध योजना मिळवून देणे, शिवसेनेच्या प्रत्येक कार्यक्रमात स्वतःला झोकून देऊन काम करणे यामुळे विलास व्हटकर यांची शिवसैनिकात हक्काचा आपला माणूस म्हणून ओळख आहे. शिवसेनेच्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी, दिव्यांग, वंचित, बेरोजगार, विधवा, वयोवृध्द यांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन, मोर्चा, उपोषणाच्या माध्यमातून त्यांनी अनेक वेळा लढा उभारण्याचे काम केले आहे. त्यामुळे कायम चळवळीतील, निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून उद्धव ठाकरे त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना बळ देतील का हे येणाऱ्या काळात पाहावे लागणार आहे.

# खडकी सदार येथील शिक्षकांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या अभियानामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खडकी सदार या शाळेने जिल्हा स्तरावरील प्रथम क्रमांक पटकावला आहे. या अभियानाचे स्वरूप, विद्यार्थी केंद्रीत उपक्रमांचे आयोजन व त्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग तसेच शाळेला गावकऱ्यांचे खूप सहकार्य नेहमीच लाभले आहे. प्रथम क्रमांक पटकावल्यामुळे शाळेतील सर्व शिक्षक वृंदांचा संजू भाऊ सदर मित्र परिवार यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.
यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय सदार तसेच प्रमुख उपस्थित मध्ये गणेश सदार, सुरेश सदार, सतीश सदार, विकास सदार, अनिल सदार, भिकाजी सदार, शिवाजी सदार, पत्रकार शंकर सदार, अमोल सदार, वैभव सदार, ज्ञानबा सदार आदी मंडळी उपस्थित होती. यावेळी संजू भाऊ सदार बोलताना म्हणाले की, जिल्ह्यात आपल्या शाळेच्या पहिला क्रमांक आला आहे, ही बाब गावासाठी खूप अभिमानाची आहे. यासाठी शाळेतील सर्व शिक्षक लोकांचे मी आभार मानतो. तसेच सर्व शिक्षक अतिशय मेहनती आहेत. शिक्षकांचे करावे तितके कौतुक खरंच कमी आहे. आमच्यासाठी जिल्ह्यात प्रथम क्रमांक आल्याने आनंदाची बाब आहेच, मात्र आपण आता यापुढे सर्व मिळून जिद्दीने काम करून आपली शाळा जिल्ह्यातच नव्हे राज्यात प्रथम कशाप्रकारे येईल यासाठी सर्व कामाला लागू आणि नक्कीच समोरच्या वर्षी आपण राज्यात प्रथम आल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास त्यांनी यावेळी बोलून दाखवला आहे.



# काळे यांचा वकील संघटनेकडून सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** फलटण येथील ॲग्रो न्यूज यांच्यावतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार स्पर्धेसाठी येथील ज्येष्ठ लेखक, कवी श्री केशव भवानी काळे यांच्या होय ! हे असंच आहे ! या आत्मचरित्राला हा पुरस्कार मिळाला त्या बद्दल न्यायालयीन विधीज्ञ मंडळींनी केशव भवानी काळे यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी विधीज्ञ सुनील जाधव , माजी जिल्हा वकील संघ अध्यक्ष, योगेश फाटके माजी सचिव, नागेश सोनवणे, रामदास चव्हाण, सुधीर रक्षाळे, अंबादास कावरे, संभाजी पानखडे, देविदास हराळ, दिगंबर वायाळ, उद्धव वाघ, मच्छिंद्र दळवी, दिलीप खंडागळे, जयसिंग तौर आणि प्रशांत निकम सुनील दीक्षित , निवृत्त पीएसआय आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. यावेळी सत्काराला उत्तर देताना केशव भवानी काळे यांनी सत्कारमूर्ती या नात्याने मनोगत व्यक्त केलेच शिवाय युवक मंडळींना यथोचित मार्गदर्शन ही केले.

# टेकडी गणेश मंदिर 'अ' दर्जाचे पर्यटनस्थळ घोषित

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** प्रसिद्ध व भोसलेकालीन टेकडी गणपती मंदिराला अखेर राज्य शासनाने 'अ' दर्जाचे पर्यटनस्थळ घोषित केले आहे. शासनाने तसा निर्णयही सोमवारी काढला. मंदिराचे बांधकाम अठराव्या शतकात राजे भोसले यांच्या कार्यकाळात झाल्याचे सांगितले जाते. भोसले आणि ब्रिटिशांची लढाई ज्या ठिकाणी झाली, त्याच ठिकाणी हे गणपतीचे मंदिर आहे. सुरुवातीला मंदिर छोटे होते. आता त्याचा विकास झाला आहे. येथे रोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. प्रसिद्ध क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरसह इतरही मान्यवरांनी या मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले आहे. येथे भेट देणाऱ्या भाविकांच्या संख्येमुळे या मंदिराला 'अ' दर्जाचे पर्यटनस्थळ घोषित करावे, अशी मागणी अनेक वर्षांपासूनची होती. सामाजिक कार्यकर्ते भूषण दडवे हे २०१३ पासून या मागणीसाठी पाठपुरावा करीत होते.
२०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी मंदिराला 'अ' दर्जाचे पर्यटनस्थळ घोषित करावे म्हणून अधिकाऱ्यांना आदेश दिले होते. पण तांत्रिक अडचणीमुळे अंमलबजावणी होऊ शकली नव्हती. दरम्यान, २०२३ मध्ये फडणवीस यांनी पुन्हा यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन सूचना दिल्या होत्या.

# शासनाच्या दडपशाहीला भीक घालत नाही

## पप्पू देशमुख यांचा पोलिस ठाण्यात अन्न व जलत्याग

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शंभर कोटी रुपयांच्या जुन्या भूमिगत गटार योजनेतील भ्रष्टाचार व 506 कोटी रुपयांच्या नवीन भूमिगत गटार योजनेच्या निविदा प्रक्रियेतील गैरवहारा विरोधात आवाज उचलल्यामुळे पोलिसांनी मला ताब्यात घेतले. शासनाच्या व पोलिसांच्या दडपशाहीचा निषेध करतो, अशा दडपशाहीला आपण भिक घालत नाही. जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्या शासनाला त्याचे परिणाम भोगावे लागतील. पोलिसांच्या ताब्यात असेपर्यंत मी अन्न व जलत्याग करित आहे. मागील पंधरा वर्षांपासून खड्डे व धुळीमुळे मानेच्या, मणक्याच्या, कमरेच्या दुखण्याने व श्वसनाच्या- हृदयाच्या आजाराने त्रस्त झालेल्या चंद्रपूरकरांना वाऱ्यावर सोडणार नाही. चंद्रपूरकरांना न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही अशी प्रतिक्रिया जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक पप्पू देशमुख यांनी दिली. मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या वेळी आंदोलनाचा इशारा दिल्यामुळे रामनगर पोलिसांनी देशमुख यांना 12 मार्च रोजी सकाळी 10.30 वाजता वरोरा नाका चौकात अटक करून ताब्यात घेतले. पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर देशमुख यांनी अन्न व जलत्याग आंदोलन सुरू केले.



15 वर्षांपूर्वी तत्कालीन नगरपालिकेने संपूर्ण चंद्रपूर शहरातील रस्ते खोदून टाकलेल्या भूमिगत गटार योजनेचे काय झाले ? ही योजना कार्यान्वयीत का झाली नाही ? योजना कार्यान्वयीत झालेली नसताना कंत्राटदाराची देयके कशी देण्यात आली? दोषी कंत्राटदार व भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई का झाली नाही ? 506 कोटींच्या नवीन भूमिगत गटार योजनेच्या निविदा प्रक्रियेत नियमांना बगल का देण्यात आली ? कंत्राटदाराने बँक गॅरंटी जमा केलेली नसताना व कंत्राटदाराला कार्यादेश दिलेला नसताना भूमिपूजनाची घाई का करण्यात आली ? अंदाजपत्रकापेक्षा 60 कोटी रुपये जास्त किमतीत कंत्राट का देण्यात आले ? राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व जिल्ह्याचे पालकमंत्री सुधिर मुनगंटीवार यांना या सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. अन्यथा चंद्रपूरची जनता त्यांना माफ करणार नाही असा इशारा देशमुख यांनी दिला.

# बुलढाणा वाहतूक पोलीसांच्या वागणूकीमुळे जाळीचा देव गाडीने येताना होतो त्रास !

## परराज्यातील भाविकांची विनाकारण होते आहे हेळसांड

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**छत्रपती संभाजीनगर :** जालना जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र जाळीचा देव व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील क्षेत्र सावळेद्वारः मराठवाडा आणि शेजारील, बुलढाणा विदर्भ जिल्ह्यांसाठी जाळीचा देव राज्यात प्रसिद्ध असलेले तिर्थक्षेत्र म्हणून परिचित आहे या जाळीचा देव येथै भाविक भक्त, व्यापारी आणि ग्राहक खास गाडीने भगवान श्रीचक्रधर स्वामी यांच्या दर्शनासाठी येतात पण येताना त्यांची अडवणूक होते...याचा आम्हाला त्रास होत असल्याचे बाहेरील भाविकांनी व व्यापा यांनी बोलताना सांगितले. दरम्यान, देवदर्शनासाठी येणारे भाविकही आपल्या गावी परतताना गिरडाघाट व बुलढाणा ते अजिंठा टाळून जातात. यामुळे येथील बाजारपेठेवर विपरीत परिणाम होतो आहे.
काही भाविक भक्त व व्यापारी आणि ग्राहकांनी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले की, आता आम्ही बुलढाणा येऊन खरेदी करावी का? याचा विचार करतोय. गाडीतून येताना सर्व कागदपत्रे जवळ असली तरी आमची अडवणूक केली जाते; पण जर चुकून एखादे कागदपत्र नसले तर होणा या त्रासाला मर्यादाच नसते. सकाळी येऊन सायंकाळी गाडीत माल घेऊन जात असताना सर्वाधिक भीती वाटते. कारण गाडीमध्ये किंमती वस्तू असतात. या स्थितीत गाडी अडवली की, आमच्या शहरात किंवा गावी पोहोचायला उशीर होतो. मार्गात असताना कुठे चोरांनी अडविले तर होणा या नुकसानीला जबाबदार कोण? असा सवाल भाविक भक्तांनी व वाहनधारकांनी उपस्थित केला. एका व्यापाराने सांगितले की, मी सावळदबारा रहिवासी आहे,



**पोलिसांची रस्त्यावर हुकुमशाही** : परराज्यातील भाविक भक्तांची वाहतूक पोलिसांकडून अडवणूक, वाहनधारक जाळीचा देव व सावळदबारा येण्यास नकार देतात, देवदर्शनासाठी भाविकांची संख्येत होतेय घट, हि अडवणूक थांबली पाहिजेत असे भाविक भक्त बोलत आहे .

माझा नारळाचा व्यवसाय आहे. मी खरेदीसाठी महिन्यातून एकदा माझ्या खासगी वाहनातून जाळीचा देव येत असतो. येताना मला अजिंठा ते बुलढाणा मढ फाट्यावर पुढे रोडवर अनेकवेळा अडवण्यात आले होते. कागदपत्रांची मागणी केली, लायसन्स विचारले, पीयूसी आहे का हे विचारले जाते. मी सावळदबारा येताना आता सर्व कागदपत्रे घेऊनच येत असतो; मात्र काही कारण सांगून वाहतूक शाखेचे पोलीस आम्हाला पावती करण्यास सांगतात. आम्ही धंदेवाईक माणसे आहोत, या झंजटमध्ये न पडता सरळ दंडाची पावती घेतो आणि निघून जातो. काही वेळेस दंडाची पावतीही दिली जात नाही. पुन्हा आमच्या गावी निघून जातो. वाईट वाटते मात्र आम्ही सांगणार कोणाला? अशी खंत एका व्यापा याने व्यक्त केली.

# कैद्यांच्या जीवनात बदल व्हावा म्हणून कारागृहात उद्योगाची सुरुवात

## कारागृह उपमहानिरीक्षक यांच्या हस्ते धुळे जिल्हा कारागृह येथे कैद्यांना नव्या कामाची सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** जिल्हा कारागृह वर्ग येथे सानेगुरुजी अपहारगृह, इस्त्रीकाम विभाग, धोबीकाम विभाग, दुचाकी वॉशिंग सेंटर, अगरबत्ती विभाग, केशकर्तनालय विभाग, लोहारकाम विभाग, बेकरी विभाग, शिवणकाम विभाग इ कारखाने तसेच ओपन जिम चे उद्‍घाटन समारंभ सन्मा. यू टी. पवार कारागृह उपमहानिरीक्षक, नाशिक विभाग नाशिक यांचे शुभहस्ते व मा. अभिनव गोयल, जिल्हाधिकारी, धुळे, मा. श्रीकांत धिवरे, पोलीस अधिक्षवर, धुळे मा. संदीप स्वामी सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे श्रीमती ममता हटकर, जिल्हा नियोजन अधिकारी, धुळे व कारागृह अधिकारी कर्मचारी यांचे उपस्थितीत पार पडला.

या समारंभावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचे मा. अधीक्षक धुळे जिल्हा कारागृह यांचेकडुन स्वागत करण्यात आले तसेच मान्यवरांचा साकार सन्मा. पु. टी. पवार, कारागृह उपमहानिरीक्षक, नाशिक विभाग, नाशिक यांनी केला.बंदयांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांचेमध्ये सुधारणा व पुर्नवसन होण्याकरीता धुळे जिल्हा कारागृहात कारखान सुरु करण्याकरीता परवाणगी दिल्याने कारागृहाची सकारात्क राजु लोकांच्या सभार येण्यास मदत झाल्याने मा.श्री. अभिन्न गोवल साहेब, मा. जिल्हाधिकारी, धुळे , सन्मा यू. टी. पवार साहेब, कारागृह उपमहानिरीक्षक, नाशिक विभाग, नाशिक पांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.सन्मा. यू.टी. पवार साहेब, कारागृह उपमहानिरीक्षक, नाशिक विभाग, नाशिक यांनी , बंदयामध्ये सुधारणा व पुर्नवसन व्हावे व कारागृहाचा विकास व्हावा याकरीता जिल्हा नियोजन समिती, धुळे यांचेमार्फत कारागृहातील कारखान्याचे साहित्य खरेदी करण्याकरीता निधी उपलब्ध करुन दिल्याने मा. श्री. अभिनव गोयल साहच मा. जिल्हाधिकारी, धुळे यांचे अभिनव गांयान साहेब, मा. जिल्हाधिकारी, धुळे यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला सन्मा. यू. टी. पवार साहेब, मा. कारागृह उपमहानिरीक्षक, नाशिक विभाग, नाशिक यांनी मा श्री संदीप स्वामी साहेब, या सचिव जिला विधी सेवा प्राधिकरण, धुळे यांचा सन्मान चिना देऊन सत्कार करण्यात आला. सन्मा. यु टी. पवार साहेब, कारागृह उपमहानिरीक्षक, नाशिक विभाग, नाशिक त्यांनी . श्रीमती ममता हटकर मॅडम, जिल्हा नियोजन अधिकारी धुळे यांचा सम्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.सन्मा. यु. टी. पवार साहेच, कारागृह उपमहानिरीक्षक, नाशिक विभाग, नाशिक यांना अशी त्यांनी मा. श्री मनिष सुर्यवंशी सर (ए. डी.पी. ओ) यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.सन्मा. यु.टी. पवार साहेब, कारागृह उपमहानिरीक्षक, नाशिक विभाग, नाशिक त्यांनी मा. श्री फादर विल्सन रॉड्डीबस, प्राचार्य सेंट अँथनी स्कुल धुळे यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला सन्मा.यु. टी. पवार साहेब, कारागृह उपमहानिरीक्षक, नाशिक विभाग, नाशिक त्यांनी मा.श्री राष जाधव साहेब, जिल्हा परिथिला अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. गरीष जाधव, जिल्हा परिविक्षा अधिकारी, फादर विल्सन रॉड्रोक्स, धुळे,श्री संदीप स्वामी, सचिव जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, धुळे,मा. श्री. अभिनव गोयल, जिल्हाधिकारी, सन्मा. यु.टी. पवार, कारागृह उपमहानिरीक्षक, नाशिक विभाग, नाशिक या सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.



# तालुक्यात ज्वारी, गहू सोंगणी काढणीला वेग

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** सद्या ज्वारी गहु सोंगणी काढणीला वेग आल्याचे चित्र आहे. वर्ष -२०२३ मधे नाममात्र तुरळक पाऊस झाल्याने खरिप रब्बी पिक दोन्ही हंगामाला फटका बसला यात वेळवर पाऊस न होता मोठा फटका दोन्ही पिक हंगामात झाल्याने उत्पन्नात मोठी घट झाली.त्यात रब्बी पिक हंगाम येण्याची जवळपास शक्यताच नव्हती परंतु शेवटच्या टप्प्यात अवकाळीने कृपा केल्याने सर्वत्र पाणीच पाणी झाले व तद्‍नंतर रब्बी पिकांना चालना मिळाली. त्यामुळे ज्वारी गहु व इतर पिकांनी तग धरला.सद्या ज्वारी गहु सोंगणी काढणीला वेग आल्याचे तालुक्यात चित्र आहे. तालुक्यात ज्वारी रब्बी पिके बोडखा लोणी रेल धामणगाव धामणी झरी शेख पूर शिवार परिसरात विशेषता घेतल्या जातात हे विशेष.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते लोणी फाटा कामात हलगर्जीपणा

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** शहरातील मुख्य बाजारपेठ असलेला रस्ता मालपणी या ठेकेदाराने एका महिन्यापासून खदुन ठेवला व रस्त्याचे काम कासव गतीने चालू आहे. हा रस्ता मुख्य बाजारपेठेमध्ये आहे, या रस्त्याच्या दोन्ही कडेला दुकाने आहेत. तसेच नगरपरिषद गाळे आहेत भाजी मंडी आहे, जीवन आवश्यक वस्तूंच्या दुकान आहेत. हा रस्ता खोदून ठेवल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात ये जा करताना त्रास सहन करावा लागत आहे. व दुकानांमध्ये धूळ उडत आहे. या रोडवर माती मिश्रित मुरूम टाकण्यात आले. या रूमवर कोणत्या प्रकारची दबाई किंवा पाणी टाकण्यात येत नाही. पाणी टाकले तर थातुर मातुर पाणी टाकत आहे. आजूबाजूच्या दुकानदारांच्या दुकानात धुळ उडत असल्यामुळे दुकानदार त्रस्त झालेले आहेत, हे काम लवकरात लवकर करण्याची मागणी व्यापाऱ्यांरी वर्गाकडून होत आहे. मात्र हा ठेकेदार उटावरूनतर घोडे राखत आहे. हा ठेकेदार कशा पद्धतीने काम चालू आहे हे सुद्धा पाहण्याकरिता आला नाही. व्यापारी वर्गाकडून मागील अनेक वर्षापासून हा रस्ता करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली होती. एका वर्षानंतर हा रस्ता चालू झाला मात्र या रस्त्याचे काम कासव गतीने सुरू असल्याने ठेकेदाराच्या हळदीपणामुळे व्यापारी वर्गाला मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. कासवगतीने काम चालू केल्यामत्यामुळे मुख्याधिकारी यांना नगरसेविका मीरा संतोष च-हाटे यांनी तक्रार देऊन नगरपरिषदेने जो इस्टिमेट तयार केला होता, त्या इस्टिमेटच्या हिशोबाने काम लवकरात लवकर करावे व कामात कोणतेही हलगर्जीपणा करू नये व नागरिकांना याचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, याकरिता तक्रार सुद्धा देण्यात आली आहे. बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी तुला कामाची पाहणी करावी व संबंधित ठेकेदार मालपाणी याला लवकर काम चालू करण्याकरिता आदेश द्यावा व बांधकाम विभागाने इस्टिमेटच्या हिशोबाने काम करून घ्यावे व इस्टिमेट मध्ये जे काम आहे, त्या पद्धतीने काम करावे. इस्टिमेटमध्ये सिकलादेवी ते लोणी फाटा असे असून ते काम त्या पद्धतीने करावे अशी मागणी सुद्धा करण्यात आली. जर हे रोड एका साईडने चालू केले कोणालाही त्रास होणार नाही व रहदारी सुद्धा एका साईडने चालू राहील पण असे होत नाही. ठेकेदाराच्या मनमानी कारभाराने हा रोड दोन्ही साईटने खोदून टाकला आहे.

> सो मीरा संतोष चराटे नगरसेविका प्रभाग 06 शितला देवी ते लोणी फाटा हा रोड माझ्या प्रभागात येत आहे . त्यामुळे वारंवार ठेकेदारांना सांगून सुद्धा ठेकेदार मनमानी कारभार करतो , व त्यामुळे नागरिकांना व दुकानदारांना त्रास सहन करावा लागत आहे . हा रोड एक साईटने काम चालू करावे व इस्टिमेट मध्ये ज्या पद्धतीने दिलेल आहे त्या पद्धतीने काम करावे कामात कुठल्याही प्रकारचा हलगर्जीपणा करू नये व निकृष्ट दर्जाचे काम करू नये याची पाहणी व दखल बांधकाम विभागाने घ्यावी . बांधकाम विभागाने या रोडचे काम चालू असताना लक्ष देण्याची गरज आहे . मात्र तसे होताना दिसत नाही . मुख्याधिकारी यांना हे काम चुकीच्या पद्धतीने व कासव गतीने चालू आहे याची तक्रार सुद्धा देण्यात आली आहे .

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपा आध्यात्मिक आघाडीची आज बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी भाजपा आध्यात्मिक समन्वय आघाडीची प्रदेश पदाधिकारी बैठक छत्रपती संभाजीनगर शहरात होत आहे. आध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष माननीय आचार्य तुषार भोसले यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि. १३ मार्च रोजी सकाळी १० ते सायं ५ यावेळेत ही बैठक होणार आहे.

यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक देशवासीयांचे स्वप्न असलेल्या अयोध्येत प्रभू श्रीराम मंदिराची उभारणी केली. काश्मिरला लागलेला ३७० कलमाचा कलंक हटवला, प्रत्येक घरात नळाने पाणी पोहोचवले, महिलांना धुरापासून मुक्तता देत उज्ज्वला योजना घराघरात पोहोचवली, महिलांच्या सन्मानार्थ असंख्य योजना पोहोचताना सनातन धर्माच्या रक्षणार्थ असंख्य कामे देखील केली. प्रत्येक घटक आज मोदीजींना धन्यवाद देताना आपण पाहतो. रस्ते, रेल्वेचे विस्तीर्ण अशा योजनांनी प्रवास सुखकर झाला असून प्रत्येक क्षेत्रात मोदी सरकारने कार्याचा ठसा उमटवला आहे. या योजना जनसामान्यांना माहिती असल्या तरी भाजपा आध्यात्मिक आघाडीच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसार केला जात आहे.

राज्यभरातील शंभराहून अधिक भारतीय जनता पार्टीच्या आध्यात्मिक आघाडीचे पदाधिकारी व विविध पंथ-संप्रदायांचे प्रतिनिधी याठिकाणी एकत्रित येत आहेत. श्रीकृष्ण मंदिर महानुभाव आश्रम येथे होणाऱ्या या बैठकीत यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षात घेतलेल्या निर्णयांसह शेवटच्या घटकापर्यंत विकास कशा पद्धतीने पोहोचवण्याचे काम केले यावर मंथन होईल. शिवाय आगामी निवडणुकीत 'अब की बार, ४०० पार' हा नारा यशस्वी करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्नांची पराकाष्ठा करून मतदारांना भाजपा आणि मित्र पक्षाच्या उमेदवारांना निवडून आणण्याचा संकल्प यावेळी करण्यात येणार आहे. तसेच लोकसभा निवडणूकीत भाजपा उमेदवारांच्या विजयासाठी आध्यात्मिक आघाडीच्या प्रचार यंत्रणेचे देखील नियोजन केले जाणार आहे. या बैठकीत कोणते ठराव संमत करण्यात आले तसेच लोकसभा निवडणूकीसाठी काय रणनिती आखण्यात आली याची सविस्तर माहिती उद्या दुपारी २ वाजता आघाडीचे प्रदेशाध्यक्ष आचार्य तुषार भोसले सर्व साधु-महंतांच्या उपस्थितीत देणार आहेत.

सर्व पत्रकारांना विनंती की त्यांनी बैठकीचे मिडीया कव्हरेज करण्याकरिता उद्या यावे. या बैठकीची माहिती माजी उपमहापौर व प्रदेश सहसंयोजक संजय जोशी, रामराव शेळके ( मराठवाडा संयोजक, भाजपा अध्यात्मिक आघाडी महाराष्ट्र ), सुदर्शन महाराज कपाटे महानुभाव ( मुख्य समन्वयक,भाजपा अध्यात्मिक आघाडी महाराष्ट्र ),यांनी दिली.

# 61 अनुदानीत आश्रम शाळांची श्रेणी वाढ करण्यास मंत्री मंडळाच्या बैठकीत निर्णय

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** समाजातील विविध क्षेत्रातील नागरीकांना न्याय देण्याचा प्रयत्न आमदार प्रतिभा धानोरकर सतत करीत असतात. त्याचाच एक भाग म्हणून आदिवासी विभागाअंतर्गत असणाऱ्या शाळांमध्ये श्रेणी वाढ व्हावी या करीता आमदार प्रतिभा धानोरकर प्रयत्नशील होत्या. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून सोमवारी झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत आदिवासी विभागाच्या 61 अनुदानीत आश्रम शाळांची श्रेणी वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे तसेच मुला-मुलींमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण होऊन त्यांनी परिपुर्ण शिक्षक घ्यावे या करीता त्यांना जिथे शिक्षण घेत आहेत त्याच ठिकाणी समोरील शिक्षणाची संधी निर्माण व्हावी या करीता आमदार प्रतिभा धानोरकर यांनी माजी आदिवासी विकास मंत्री के. सी. पाडवी तथा विद्यमान आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित साहेब वारंवार भेटून आदिवासी अनुदानित आश्रम शाळेत श्रेणी वाढ व्हावी अशी मागणी केली होती. त्यासोबतच अधिवेशनादरम्यान श्रेणी वाढ चा मुद्दा उपस्थित करुन सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांच्या या प्रयत्नांना यश प्राप्त झाले असून सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले आहे. लवकरच या संदर्भात शासन निर्णय जारी होईल. 17 उच्च प्राथमिक शाळांना माध्यमिक चा वर्ग जोडण्यात येईल तसेच 44 माध्यमिक शाळांना उच्च माध्यमिक चा वर्ग जोडण्यात येणार आहे. या निर्णयामुळे आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून अनुदानित आश्रम शाळा संस्था चालकांनी आमदार प्रतिभा धानोरकर यांचे आभार मानले आहे.

# निकृष्ट दर्जाच्या कामामुळे जलजीवनच्या विहिरीला तडा

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत मध्ये मजूर सहकारी संस्था, बेरोजगार अभियंता आणि विविध संस्थांच्या नावाखाली काही लोकप्रतिनिधींनी किंवा त्यांच्या जवळच्या नातलगांनी व अतांत्रिक ठेकेदारी सुरू केली आहे. परिणामी कामाचा दर्जा खालावला असून, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे शासनाच्या उद्देशाला हरताळ फासल्या जात आहे. महागाव येथील जल जीवन मिशनच्या विहिरीला उभे तडे गेल्यामुळे सदर विहीर परत दुसरीकडे नवी बांधावी लागत आहे. मात्र यात व्यर्थ गेलेल्या कामात शासनाच्या लाखो रुपयाला चुना लागला आहे.

पंधराव्या वित्त आयोगातून उपलब्ध होणारा करोडो रुपयांचा निधी आणि आमदार खासदार यांच्या स्थानिक विकास निधीतून सद्यस्थितीत कामाचा धडाका सुरू आहे. त्यामुळे सिमेंट काँक्रिट रस्ते, नाली बांधकाम आणि सभामंडपाच्या कामांना ऊत आला आहे. सदर कामांमुळे अतांत्रिक ठेकेदारांची दुकानदारी जोमात सुरू झाली आहे. मात्र मलिदा लाटण्याच्या नादात कामाचा दर्जा किती खालावला याकडे लोकप्रतिनिधी पासून प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे साफ दुर्लक्ष



होत आहे. घर तिथे नळ हे उद्दिष्ट समोर ठेवून केंद्र शासनाने जलजीवन मिशन ही योजना सुरू केली आहे. या योजनेतून ग्रामपंचायतला करोडो रुपयाचा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. परंतु राजकीय पुढाऱ्यांचा हस्तक्षेप आणि सरपंचांना दिलेल्या विशेष अधिकारामुळे सदर योजनेवर सनियंत्रण करणारी प्रशासकीय यंत्रणा कुचकामी ठरत आहे. त्यामुळे शासनाच्या मूळ उद्देशाला हरताळ फासला जात असल्याचे अधोरेखित होत आहे. लोकप्रतिनिधींच्या मर्जीतील व अतांत्रिक ठेकेदाराला काम दिल्या जात असल्यामुळे कामाचा दर्जा खालावला असून, निकृष्ट दर्जाच्या कामात वाढ झाली आहे. तालुक्यातील महागाव येथील

**कमिशन खोरीमुळे कामाचा दर्जा खालावला :**
लोकप्रतिनिधींना द्यावे लागणाऱ्या कमिशन मुळे सबंधित कंत्राटदार प्रशासकीय मान्यता मिळालेल्या निधीपेक्षा निम्म्याहून कमी खर्चात काम कसे करता येईल याकडे लक्ष देतात . याचा थेट परिणाम कामाच्या दर्जावर पडत आहे . तालुक्यात अनेक गावात सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामात बेस, खडीकरण व रोलरिंग न करता सिमेंट रस्ते तयार करण्यात आले आहेत . परिणामी तयार झालेल्या सिमेंट रस्त्यावर वाहनाच्या ओझाने खड्डे पडत आहेत . मात्र कमिशन खोरीमुळे नियंत्रण ठेवणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा लोकप्रतिनिधी काहीही बोलू शकत नाही असे सर्वसामान्य जनता बोलत आहेत .

जलजीवनच्या विहिरीला गेलेले तडे हे निकृष्ट दर्जाच्या कामाचे ज्वलंत उदाहरण आहे. आणि हीच गत तालुक्यात अनेक ठिकाणी पाहावयास मिळत आहे. तर अनेक सरपंचांनी पाण्याचा कुठलाही स्त्रोत न पाहता सदर योजनेची विहीर स्वतःच्या किंवा जवळच्या नातलगांच्या शेतात घेतल्यामुळे बऱ्याच विहिरी पाण्याअभावी कोरड्या असून, सदर गाव योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे संबंधीत गावातील लोक बोलत आहेत. प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकाराकडे लक्ष घालून काम केल्यास निकृष्ट दर्जाच्या कामाला निश्चितच आळा बसेल असे गावातील नागरिक बोलत आहेत.



# अकोलकर दांपत्याकडून माऊली चरणी चांदीचा मुकुट अर्पण

आधुनिक केसरी न्यूज

**अजय नजन**

**शेवगाव :** तालुक्यातील भायगाव येथील श्रीहरी अकोलकर महाराज व सौ मंदाकिनी अकोलकर यांच्याकडून संत ज्ञानेश्वर महाराजांना चांदीचा मुकुट अर्पण करण्यात आला. यावेळी माऊली मंदिर विस्वस्त मंडळ तुकाराम महाराज माने, आळंदी नगराध्यक्ष सचिन गिलबिले, माऊली दुकळे, भारत सातपुते, गजानज महाराज, सोनुने मुरली, महाराज गावडे, अतुल डांगे, आदिनाथ महाराज म्हस्के, सदाशिव महाराज तागडे आदी उपस्थित होते.



**छत्रपती संभाजीनगर येथील प्रथितयश लेखिका, प्रेरक व्याख्यात्या तथा उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांना रविवार दिनांक दहा मार्च रोजी शिर्डी येथे एका समारंभात लंडनच्या वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस् (युनायटेड किंगडम) या संस्थेचे अध्यक्ष संतोष शुक्ला यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानपत्र आणि पदक देऊन गौरविण्यात आले. समाजातील सर्व स्तरातून अंजली धानोरकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

# ग्रा.पं.च्या करवसुलीसाठी अधिकारी घरोघरी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जामोद :** पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायतची घर व पाणिकर वसुली मोहीम जोरात सुरू असून, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय पाटील व सहा. गटविकास अधिकारी संदीप मोरे हे थेट ग्रामीण भागात घरोघरी फिरून कर वसुली मोहीम राबवित् आहेत.

तालुक्यातील ४७ ग्रामपंचायत मध्ये ग्रामपंचायत कर वसुली प्रलंबित असून ग्रामसेवक, सरपंच व सदस्य वसुली साठी घरोघरी फिरत आहे. १४० गाव नळयोजनेचे लाखो रुपयांचे बिल ग्रामपंचियत कडे थकीत असून वसुली भरण्यास खातेदारामध्ये उदासीनता दिसून येत आहे. वास्तविक पाहता कर वसुली वरच ग्रामपंचायत ची काम होत असतात परंतु ग्रामपंचायत पाठपुरावा करूनही लोक वसुली भरत नाही, दिव्यांग खर्च, महिला बाल कल्याण खर्च मागासवर्गीय



खर्च, गावातील स्वछता शुद्ध पाणीपुरवठा गटारे सफाई यासाठी निधी ची गरज वसुली मधून करावी लागते, यासाठी आता उपाय योजना म्हणून पं.स स्तरावरून कर वसुली साठी कॅम्प चे आयोजन करण्यात आले आहे.१२ मार्च रोजी आसळगाव ग्रा प अंतर्गत वाडी येथे गटविकास अधिकारी संजय पाटील

तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत चे खातेदारांनि आपले कडील कराच भरणा करावा जेणे करून सर्वच सुविधा देणे सोयीचे होईल .
**संजय पाटील, गटविकास अधिकारी जळगाव जामोद**
ग्रामपंचायत चे पाणीपुरवठा बिल थकीत असणाऱ्यांनी तात्काळ भरणा करावा अन्यथा ग्रामपंचायत नळ कनेक्शन बंद करण्याची कारवाई करेल, तसेच सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यास ग्रामपंचायत सक्षम राहील .
**संदीप मोरे, सहाययक गट विकास अधिकारी, जळगाव जामोद**

व ग्रा प चे सर्व पदाधिकारी ग्रामसेवक हे वसुली साठी घरोघरी जाऊन वसुली भरण्याचे आवाहन केले, तर खांडवी येथे सहा गटविकास अधिकारी संदीप मोरे यांनी खांडवी गावांमध्ये ग्रामसेवक गिऱ्हे व ग्रामपंचायत सदस्य यांचेसह करवसुली साठी घरोघरी जाऊन जावून लोकांना कर भरण्यासाठी आवाहन करत आहे.

# जय सेवा महिला मंडळने फुलविले वृद्धांच्या चेहऱ्यावर हास्य

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आजच्या या धकाधकीच्या जीवनात सयुक्त कुटुंबाची संकल्पना हि लोप पावत आहे आणि परिणामी न्यूक्लियर फमिली ची संकल्पना पुढे येत आहे. ज्यामुळे आजच्या पिढीला आपले आजी-आजोबा च प्रेम, त्यांचा सहवास, त्यांच्या गोष्टी, आदी पासून वंचित होत आहेत. आज पती-पत्नी या दोघाला करियर च्या नावाने घरामध्ये वयोवृद्ध व्यक्ती नकोसे वाटतात परिणामी ते आपल्या आई-वडिलांना वृद्धाश्रम मध्ये नेऊन टाकतात आणि वृद्ध हे आपल्या कुटुंबाच्या सुखापासून वंचित होतात. असच काहीसे चित्र चंद्रपूर शहरात सुद्धा पाहायला मिळते. अगदी चंद्रपूर ला लागूनच असलेल्या देवाडा या गावात सुभाष शिंदे याचं डेबु सावली या नावाने वृद्धाश्रम आहे आणि या वृद्धाश्रमच्या माध्यमातून सुभाष शिंदे हे एकाकी पडलेल्या वृद्धांना कौटुंबिक आनंद देण्याचा प्रयत्न करत असतात. यालाच प्रतिसाद देत चंद्रपूर, चंद्रपूर च्या बाहेरील व्यक्ती हे या डेबु सावली वृद्धाश्रम मध्ये आपल्या कुटुंबांसोबत येतात आणि या एकाकी पडलेल्या वृद्धानसोबत एक दिवस घालवून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा प्रयत्न करतात.

असाच छोटासा प्रयत्न हा जय सेवा महिला मंडळ, चंद्रपूर च्या महिलांनी नुकताच डेबु सावली वृद्धाश्रम मध्ये जाऊन केला. जय सेवा महिला मंडळ च्या सर्व महिलांनी त्यांच्या सोबत काही क्षणच नाही घालविले तर त्यांचे आरोग्य विषयी सुद्धा जाणून घेण्याचा प्रयत्न केला आणि महिला मंडळ च्या वतीने त्यांना दैनदिन लागणाऱ्या वस्तु पुरविण्याचा छोटासा प्रयत्न केला. या छोटेखाणी कार्यक्रमला यशस्वी करण्याकरिता संगीता दुर्वे, मालती कोरांगे, प्रीती मेश्राम, रेखा टेकाम, अन्नपूर्णा बावनकर, हेमलता खोब्रागडे, रूपाली रायपुरे, अनिता पुसम, वैशाली जीवतोडे, उषा तलांडे, सौभाग्य, कुडुमते, वर्षा मडावी, वर्षा धडांजे, उज्वला साठवणे, पायल, आदींनी परिश्रम केलेत.





# टंचाईग्रस्त गावे घोषित करण्याबाबत निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** दुष्काळ जन्य परिस्थिती खंडाळा तालुक्यात निर्माण झाल्याने टंचाई ग्रस्त गावे घोषित करण्याबाबतचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आलेले आहे.खेड बुद्रुक गावचे सरपंच गणेश धायगुडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली खंडाळा तहसीलदार अजित पाटील यांना निवेदन देत व्यथा मांडण्यात आलेल्या आहेत.हे निवेदन देताना सुखेडचे गजेंद्र मुसळे ,पाडळीचे माजी सरपंच दत्तात्रय धायगुडे,बोरी गावचे सरपंच बापूराव धायगुडे, मावशी गावचे सरपंच कृष्णा बाबुराव भुजबळ, अहिरे गावचे सरपंच रवींद्र सोनवणे, शिवाजीनगरचे माजी सरपंच राजेंद्र भोसले, खेडचे माजी सरपंच सचिन धायगुडे अजनुजचे माजी सरपंच मयूर भोसले, हरळीचे उपसरपंच अनिल शिवाजी बरकडे, घाटदरेचे उपसरपंच धनंजय सोळसकर, खेड बुद्रुकचे चेअरमन, किसनराव धायगुडे, मुकुंद धायगुडे, माऊली जगताप, बाबुराव धायगुडे, सुरेश शेळके, विशाल शेळके, प्रवीण दुरगुदे,आप्पा येळे, नितीन वाघमारे, संतोष धायगुडे, दीपक व्हटकर, राहुल व्हटकर, महेश व्हटकर आदी उपस्थित होते.दिलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की,खंडाळा तालुक्यामध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. पिण्याच्या पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत देखील आटले आहेत. अशा परिस्थितीमध्ये नागरिकांची पाण्यासाठी वणवण सुरु झाली असून आपल्या कार्यालया मार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी २४ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे.ह्या गावांव्यतिरिक्त अनेक ठिकाणी टंचाई निर्माण झालेली आहे. प्रामुख्याने निंबोडी, पाडळी, बोरी, वेळेवाडी, खेड बु.।।, अहिरे, हरळी, म्हावशी, अजनुज ही गावे टंचाईग्रस्त म्हणून घोषित करणेकामी आपल्या कार्यालयामार्फत आदेश देणेत यावेत.ही विनंती सुद्धा करण्यात आलेली आहे.

# ‘एडका’ हे आत्मनिष्ठ व सत्यनिष्ठ आत्मचरित्र : डॉ. काळे

## डॉ. मुरहरी केळे यांच्या आत्मचरित्राचे थाटात प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** आत्मचरित्राचे मोठेपण हे आत्मनिष्ठेवर, सत्यनिष्ठेवर, सौंदर्य निर्माण करण्याच्या क्षमतेवर आणि आस्वादमानतेवर असते. या चारही गोष्टी डॉ.मुरहरी केळेंच्या आत्मचरित्रात विपुल प्रमाणात आहेत. हे सर्वांगसुंदर आत्मचरित्र आहे, असे गौरवोद्‌गार ज्येष्ठ साहित्यिक व 90 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे यांनी काढले.

ज्येष्ठ साहित्यिक, संत साहित्याचे अभ्यासक व महावितरणचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे लिखित 'एडका' या आत्मचरित्राचे डॉ. काळे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. तापडिया नाट्यमंदिरात रविवारी (10 मार्च) झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी होते. प्र-कुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. यशपाल भिंगे, डॉ. महेश खरात, संस्कृती प्रकाशनच्या मनीषा केळे व अन्वी पब्लिकेशन्सच्या डॉ.कविता मुरूमकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.काळे म्हणाले की, केळेंचे आत्मचरित्र हे समूहमनाचे नव्हे, तर व्यक्तीमनाचे प्रतिनिधीत्व करते. तरीही त्याच्या मौलिकतेला कुठेही बाधा येत नाही. निवृत्तीनंतर केळेंनी नोकरी, व्यवसाय न करता लेखनावरच भर द्यावा. आतापर्यंत त्यांनी चरित्र, आत्मचरित्र लिहिले. आता त्यांनी ललित कृतीच्या क्षेत्रात उतरले पाहिजे. त्याच्यात वेगळं अनुभूतीक्षेत्र दिसेल. कथा, कादंबरीच्या प्रांतातही ते वेगळी कामगिरी करतील. त्यांच्या आत्मचरित्रात व्यक्तीचित्रांची, कथेची बिजे आहेत. केळे हे अनेक परिमाणांनी युक्त असे व्यक्तिमत्त्व आहे. ते प्रामुख्याने विद्युत अभियंता असले तरी त्यांच्यात कल्पकता व संशोधनवृत्ती आहे. लेखक म्हणूनही त्यांनी मोठी झेप घेतलेली आहे. त्यांचे संपूर्ण आयुष्य व्यवस्थेशी टक्कर देण्यात गेले आहे. त्या दृष्टीने ‘एडका’ हे त्यांच्या आत्मचरित्राचे नाव समर्पक आहे, असे डॉ.काळे म्हणाले.

डॉ.खरात म्हणाले की, केळेंच्या आत्मचरित्रात जवळपास 5 ते 7 हजार व्यक्तींच्या नोंदी आहेत. ‘एडका’ हे झंझावाती आत्मकथन आहे. कोकरू, बालिंगा, एडका व एडक्याच्या धडका या चार भागांत या आत्मचरित्राचा पट मांडलेला आहे. प्रतिकूल परिस्थितीत जन्माला येऊनही स्वतःच्या कर्तृत्वाने, विद्वत्तेने झेप घेतो. ती झेप या आत्मचरित्रात आहे.

डॉ.भिंगे म्हणाले की, आपल्या जगण्याची परिभाषा शिव आहे. आव्हान पेलणे मानवी जीवनाचे वैशिष्ट्य आहे. संघर्ष तुम्हाला आपल्याच माणसाशी करावे लागतात. ज्याच्या आयुष्यात प्रचंड संघर्ष आहे, त्याच्या आयुष्यात निर्मिती आहे. मुरहरी केळे हा रडका लेखक नसून एडका लेखक आहे. कारण धडका घेण्याच्या उर्मीलाही गुणसूत्र आवश्यक असतात. सध्या शेतकरी समाज रस्त्यावर उतरला त्याचे कारण हेच गुणसूत्र आहे. पूर्वग्रहात अडकलेला माणूस लेखक होऊ शकत नाही, ही लेखनाची पूर्वअट असते. निर्मळ मनाचा माणूसच निर्मळ लेखन करू शकतो, असे प्रतिपादन डॉ. भिंगे यांनी केले.

लेखक डॉ.केळे म्हणाले की, ‘एडका’ लिहिताना अनेकदा डोळे पाझरले. साहित्य लेखन म्हणजे प्रसववेदना असते. त्याचा यथार्थ अनुभव घेतला. अशिक्षित पण सुसंस्कृत आईवडिलांनी माझ्यावर उत्तम संस्कार केले. घरातील वारकरी वातावरणाने माझे बालपण घडले. वीज क्षेत्रात महाराष्ट्रासह त्रिपुरा, मध्य प्रदेश या राज्यांतही काम केले. उच्चपदस्थ अधिकारी होईपर्यंत परिस्थितीशी केलेला संघर्ष आत्मचरित्रात शब्दबद्ध केला आहे. माझा जीवन प्रवास मांडताना साहित्यमूल्य किंवा आकृतीबंधाचा विचार केला नाही. माझे आत्मकथन मुक्तकथन आहे. एडका अन्यायाच्या विरोधात धडका देणारा असतो. या आत्मकथनातील एडका हे नायकाचे आणि धाडसाचे प्रतीक आहे, असे डॉ.केळे म्हणाले.

कुलगुरू डॉ.फुलारी म्हणाले की, सांगोला तालुक्यातील माझ्या गावी यात्रेनिमित्त एडक्यांच्या टकरी होतात. केळे यांच्याशी बोलताना त्यांनीही अनेकांना टकरी दिल्या असतील याची प्रचिती आली. कारण अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांचा प्रवास झाला आहे. या परिस्थितीशी संघर्ष करून त्यांचे मुळात हुशार असलेले व्यक्तिमत्त्व आकाराला आले. एक उत्तम साहित्यकृती वाचल्याचा आनंद झाला, असे ते म्हणाले.

या आत्मकथनातील नायक आकलनाच्या व्यवस्थापनातून मार्ग काढणारा आहे. नायकाचा प्रवास थक्क करणारा आहे, असे डॉ.मुरुमकर म्हणाल्या. ॲड.अनंत देवकाते यांनी प्रास्ताविक केले. वैशाली नांदगावकर यांनी सूत्रसंचालन केले आणि दीपक माने यांनी आभार मानले.

मनीषा केळे, डॉ. महेश खरात, डॉ. यशपाल भिंगे, डॉ.अक्षयकुमार काळे, डॉ.मुरहरी केळे, डॉ. विजय फुलारी, डॉ. वाल्मिक सरवदे.

# चंद्रपूरकरांच्या आरोग्याशी खेळणे मुख्यमंत्र्यांना महागात पडेल : देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 15 वर्षांपूर्वी 100 कोटी रुपये खर्च करून टाकण्यात आलेली जुनी भूमिगत गटार योजना फसल्यानंतर त्याची साधी चौकशी सुद्धा केली नाही. कंत्राटदाराचे संपूर्ण 100 कोटी रुपयांचे देयके अदा केले. नेते आणि अधिकारी या योजनेतील मलिदा लाटून मोकळे झाले. खड्डे आणि धुळीचे परिणाम मात्र चंद्रपूरकरांना भोगावे लागले.

आता 506 कोटी रुपयांच्या नवीन गटार योजनेचे 12 मार्च रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे. जनतेच्या हितासाठी नव्हे तर 506 कोटींच्या निधीतून कमिशन लाटण्यासाठी अधिकारी व नेते जबरदस्तीने नवीन भूमिगत गटार योजना चंद्रपूरकरांवर थोपवत आहेत असा आरोप जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष मनपाचे माजी नगरसेवक पप्पू देशमुख यांनी केला. मुख्यमंत्री शिंदे व पालकमंत्री मुनगंटीवार यांनी जबरदस्तीने नवीन भूमिगत गटार योजना थोपविण्याचा प्रयत्न केल्यास चंद्रपूरची जनता त्यांना कदापी माफ करणार नाही. नवीन भूमिगत गटार योजनेचे काम मिळालेला कंत्राटदार मुख्यमंत्र्यांच्या ठाणे या गावापासून 29 किलोमीटर वरील उल्हासनगरचा आहे. कदाचित मुख्यमंत्र्यांचे या कंत्राटदाराशी हितसंबंध असतील. गावाजवळच्या कंत्राटदाराची त्यांना जास्त काळजी असेल. मुख्यमंत्र्यांनी गावा जवळच्या कंत्राटदारापेक्षा चंद्रपूरच्या जनतेची काळजी घ्यावी. अन्यथा मुख्यमंत्री व पालकमंत्री दोघांनाही चंद्रपूरकरांच्या आरोग्याशी खेळ करणे महागात पडेल, त्यांना याचे राजकीय परिणाम भोगावे लागतील असा इशारा देशमुख यांनी दिला. मल:निसारण योजना म्हणजेच नवीन भूमिगत गटार योजनेचे 12 मार्च रोजी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. याच दिवशी 100 कोटीच्या फसलेल्या जुन्या भूमिगत गटार योजनेची चौकशी व नवीन योजनेच्या निविदा प्रक्रियेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याच्या मागणी करिता जनविकास सेनेतर्फे जन आंदोलन सुरू करण्यात येत आहे. कोणत्याही मोठ्या योजनेचे काम सुरू करताना सर्वप्रथम निवड झालेल्या कंत्राटदाराला लेटर ऑफ इंडेट दिल्या जाते. यानंतर निवड झालेला कंत्राटदार काम करण्यास राजी असल्यास कंत्राटदार नियमाप्रमाणे बॅंक गॅरंटीची रक्कम जमा करतो. बँक गॅरंटी ची रक्कम कंत्राटदराने जमा केल्यानंतर मनपाचे आयुक्त स्टॅम्प पेपरवर लेखी करार करून कंत्राटदराला कामाचा आदेश म्हणजेच कार्यादेश देतात. कार्यादेश दिल्यानंतर कंत्राटदराकडून प्रत्यक्ष कामाची सुरुवात करण्यात येते. नवीन भूमिगत गटार योजनेचे 11 मार्च रोजी भूमिपूजन करण्यात येणार होते. मात्र रविवारी 10 मार्च रोजी पर्यंत कंत्राटदाराला कार्यादेश मिळाला नव्हता. कंत्राटदाराने बँक गॅरंटी जमा केली नव्हती. या सर्व प्रक्रियेला बगल देऊन व नियम डावलून भूमिपूजनाची घाई करण्यात येत आहे. 506 कोटी रुपये खर्च असलेल्या योजनेच्या निविदा प्रक्रियेसाठी कमालीची घाई करण्यात येत आहे. नियम डावलून योजनेचे भूमिपूजन करण्याची घाई करण्याचा प्रकार संशयास्पद असल्याचा आरोप देशमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केला.

**506 कोटीं मधील वरच्या 60 कोटींचे भागीदार कोण ?** नवीन भूमिगत गटार योजनेसाठी जानेवारी 2024 मध्ये महाराष्ट्र जिवंत प्राधिकरणाने 448 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक मनपा प्रशासनाला दिले . प्रत्यक्ष निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर अंदाजपत्रकापेक्षा जास्त दर टाकलेल्या कंत्राटदाराची निवड करण्यात आली . तडजोड करून कंत्राटदाराला 13 .50% अधिकच्या दराने काम देण्यात आले . अंदाजपत्रकापेक्षा जवळपास 60 कोटी रुपये अधिकच्या किमतीमध्ये कंत्राटदाराला काम देण्यात आले . अंदाजपत्रकाच्या वरच्या 60 कोटी रुपयांमध्ये कोण कोण भागीदार आहेत याचे उत्तर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व जिल्ह्याचे पालकमंत्री सुधिर मुनगंटीवार यांनी जनतेला द्यायला हवे . अमृत पाणीपुरवठा योजना, अमृत मल :निसारण योजना व जुनी भूमिगत गटार योजनेमध्ये केंद्र सरकारच्या शेकडो कोटींचा निधी खर्च करताना गैरव्यवहार झाल्याने याची सीबीआय मार्फत चौकशी होणे गरजेचे आहे तसेच चंद्रपूर महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराच्या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शासनाने एसआयटी स्थापन करावी अशी मागणी जनविकास सेनेने केली .

**हिम्मत असेल तर चंद्रपुरात भूमिपूजन करून दाखवा** : नवीन भूमिगत गटार योजनेचे भूमिपूजन विसापूर येथे करण्यात येणार असल्याची माहिती माध्यमातून मिळाली आहे . योजना चंद्रपूर शहराची आणि भूमिपूजन विसापुरात हा अजब प्रकार आहे . 'शहरातील सर्व रस्ते खोदून 506 कोटी रुपयांच्या भूमिगत गटार योजनेसाठी पाईपलाईन टाकण्याच्या कामाचे भूमिपूजन', असे स्पष्ट फलक लावून मनपा प्रशासनाने चंद्रपूर शहराच्या आत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन करण्याची हिम्मत दाखवावी असे आव्हान पप्पू देशमुख यांनी प्रशासनाला दिले .



# रयत शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी सराटे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील सामाजिक कार्यकर्ते हरिदास सराटे यांची रयत शेतकरी संघटनेच्या (छ.संभाजीनगर) जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. नगर जिल्ह्यातील नेवासा येथे झालेल्या शेतकरी कार्यकर्ते मेळाव्यात रयत शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा.एड रवी प्रकाश उर्फ बापूसाहेब देशमुख यांच्या हस्ते रयत शेतकरी संघटना छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदी हरिदास सराटे यांना नियुक्तीपत्र देऊन नियुक्त करण्यात आले यावेळी महाराष्ट्रभरातून आलेले पदाधिकारी उपस्थित त्रिंबक नागरे तात्या मराठवाडा अध्यक्ष तय्यब पटेल कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य बबनराव गायकवाड कायदे सल्लागार अजय सावंत युवा अध्यक्ष संजय पाटील सुनील ठोसर प्रदेश सरचिटणीस रामदास कोतवाल उत्तर महाराष्ट्र श्रीमती नयना ताई गवळी महिला प्रदेशाध्यक्ष उत्तर महिला महाराष्ट्र अध्यक्ष रेश्मा पटेल सुनीताताई जाधव अंकुश हंबीर हर्षवर्धन भैया देशमुख सुरेश नागरे गुलाम पटेल सय्यद मजहर रहीम पटेल जुलेखा मॅडम सुनिता पठारे विनायत खा पठाण नेवासा तालुका अध्यक्ष गणेश सोनवणे उपस्थित होते.

# आमदार जोरगेवारांची तरूणाईला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशाला विश्वगुरूपदी आसनस्थ करण्यासाठी या तरुणाईमध्ये असलेल्या वायुरूपी शक्तीला योग्य दिशा देणे अत्यंत आवश्यक आहे. आणि म्हणूनच या तरुणाईला आ.जोरगेवार यांनी अद्यावत अशा व्यायामशाळेसह अभ्यासिकेची भेट देऊन तरुणाईच्या विचारांना नवी दिशा तर शरीराला सौष्ठ्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न आ. जोरगेवारांनी केला आहे. शरीर निरोगी रहावे म्हणून व्यायाम शाळा, त्याच्यासोबत अभ्यासिका अशा दोनही गोष्टी एकाच ठिकाणी युवकांना मिळाल्या तर या देशाचा युवक खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मितीमध्ये आपली भूमिका बजावू शकेल . हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून चंद्रपूर विधानसभा निर्वाचन क्षेत्राचे लोकप्रिय आ. जोरगेवार यांनी बाबूपेठ परिसरात असलेल्या महादेव मंदिरा जवळ अभ्यासिका आणि व्यायामशाळेचे भूमिपूजन केले.






# कर्तृत्ववान स्त्रियांचा इतिहास जाणून घेणे आवश्यक : न्यायाधीश संजना जागुष्टे

आधुनिक केसरी न्यूज

**अजय नजन**

**शेवगाव :** येथील न्यू आर्ट्स महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त शेवगाव येथील दिवाणी न्यायाधीश संजना जागुष्टे यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. आठ मार्च रोजी सर्वत्र जगभरात महिला दिन साजरा होत आहे. हाच दिवस प्रत्येक महिलेसाठी सन्मानाचा, अभिमानाचा आणी आनंदाचा दिवस आहे आणि याच दिनी अनेक ठिकाणी कर्तृत्ववान महिलांचे सत्कार होतात, पुरस्कार दिले जातात, महिलांच्या कार्याची दखल घेत सन्मान केला जातो, असा हा महिला दिन दरवर्षी आनंदात, उत्साहात साजरा केला जातो. आजच्या स्त्रीमध्ये प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने काम करण्याचे सामर्थ्य, शक्ती आहे. सध्या समाज माध्यमांचा विद्यार्थ्यांवर प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो त्यामुळे गरज आहे ती फक्त जिद्दीने आपले ध्येय साध्य करण्याचे आपला बहुमुल्य वेळ वाया न घालवता मिळेल त्या संधीचे सोने करा आणि समाज माध्यमांचा उपयोग चांगल्या कामासाठी करा असा सल्ला न्यायाधीश संजना जागुष्टे यांनी विद्यार्थांना केला. त्याचबरोबर जागतिक महिला दिनाच्या क्रांतीचा उहापोह केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी अध्यक्षीय मनोगतातून आपल्याकडे समाजामध्ये लहानपाणापासून मुलींवर व मुलांवर जे संस्कार केले जातात त्यात फरक दिसून येतो तो कुठे तरी बदल झाला पाहिजे असे मत मांडले. यावेळी महाविद्यालयातील सर्व महिला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय कार्यक्रम अधिकारी डॉ.गोकुळ क्षीरसागर यांनी केले.यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. युवराज सुडके, कार्यक्रम अधिकारी डॉ. उषा शेरखाने, ग्रंथपाल प्रा. मिनाक्षी चक्रे, डॉ. छाया भालशंकर,पत्रकर अजय नजन, ॲड. ज्ञानेश्वर गाडेकर, ॲड. अजय मोहिते व मोठ्या संख्येने महाविद्यालयातील महिला प्राध्यापक आणि मोठ्या प्रमाणात विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विठ्ठलराव देवढे यांनी केले तर आभार डॉ. रवींद्र वैद्य यांनी मानले.

# वधु वर मेळाव्याचा लाभ घ्यावा : योगीराज गाडे

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** नगर शहरामध्ये सकल मराठा समाज व मराठा सोयरीक संस्था आयोजित मोफत मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरसेवक योगीराज शशिकांत गाडे व मराठा सोयरीक संस्थेचे अध्यक्ष अशोक कुटे यांनी केले आहे. हा मेळावा हॉटेल यश ग्रँड, स्टेशन रोड येथे शनिवार दि. 16 मार्च दुपारी एक वाजता होणार आहे.

मराठा सोयरीक संस्थेने आतापर्यंत ८४ यशस्वी वधु वर मेळावे मोफत घेतले आहेत.या संस्थेकडून आत्तापर्यंत 3500 लग्न पार पडले आहेत. त्यापैकी 600 लग्न हे विधवा, विदुर घटस्फोटीत यांचे पार पडले आहे. धर्मादाय कार्यालयात नाव नोंदणी केलेली अशी शासनमान्य ही संस्था आहे. आजकाल मुलांना लग्नासाठी लवकर मुली मिळत नाहीत, लग्न जमत नाही. तसेच शेतकरी मुलांसोबत कोणी लग्न करायला तयार होत नाही. आपले नातेवाईक मित्रपरिवार यांना देखील वेळ मिळत नसल्याने कोणीही स्थळ दाखवण्यात आता मदत करत नाही, म्हणून अशा वधू-वर मेळाव्यांची गरज पडत आहे.

वधू वर पालकांनी मोफत मराठा वधू वर मेळाव्याचे लाभ घेण्याचे आवाहन अ.नगर जिल्हा कृषी कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमन जयश्री कुटे, श्रीपाद दगडे, नानासाहेब दानवे, संजय रेपाळे, प्रमोद झावरे,जयवंत सरोदे, अन्नपूर्णा ढम, पारुनाथ ढोकळे, अंजना पठारे, पूजा पवार, अनिल अकोलकर, कल्याण कुटे, मधुकर निकम, उदय अनुभुले प्रा.संभाजी भोसले, संदीप नवसुपे, प्रा. योगेश कोतकर, मोहन हेलकुटे यांनी केले आहे.

या मेळाव्यासाठी वधू-वरांनी स्वतः दोन बायोडाटा, 2 फोटो घेऊन पालकांसह येणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी 7447785910 या नंबर वर संपर्क करण्याचे आवाहन संस्थेने केले आहे.

# सुसंस्कार हे विद्यार्थ्यांना बालवयात मिळतात

## ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के

आधुनिक केसरी न्यूज



**लक्ष्मण मडके**

**शेवगाव :** सुसंस्कार हे विद्यार्थ्यांना बालवयातच मिळतात विद्यार्थी घडवायचे काम शिक्षक करत असतात मात्र विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या सूचनेचे व तंतोतंत पालन केले तर भगतसिंग राजगुरू यासारखे देशभक्त या आपल्या शाळेतही तयार होतील असे प्रतिपादन श्रीराम महाराज झिंजुर्के यांनी कार्यक्रम प्रसंगी केले.

शेवगाव तालुक्यातील सालवडगाव जिल्हा परिषद शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के श्रीसंत जोग महाराज संस्कार केंद्र आखेगाव, गटविकास अधिकारी राजेश कदम,सरपंच अन्नासाहेब रुईकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

बालवयात विद्यार्थ्यांवरती योग्य संस्कार करून शिक्षक भावी पिढी घडविण्याचे काम करतात. आपल्या पाल्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी आपल्या शाळेतील शिक्षिका या सदैव प्रयत्नशील असतात.

असे गौरवोद्गार गटविकास अधिकारी राजेश कदम यांनी काढले.

यावेळी विस्तार अधिकारी शैलजा राऊळ, शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती खंडागळे, शिक्षिका ज्योती गायकवाड , संजय ढोले सर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप लांडे विषयतज्ज्ञ त्रिंबक फपाळ, आदी उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत पोवाडा,गीतगायन, भावगीत, भक्तिगीते, नृत्य अशी विविध कलागुण सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.

सालवडगाव ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत बक्षिसांचा वर्षाव केला. धनंजय औटी यांनी शाळेतील बालकांना प्रतिज्ञासाठी स्पीकर व प्रिंटर शाळेला भेट दिला. माजी सरपंच साखराबाई औटी यांनी विद्यार्थ्यांचे पारितोषिक स्वखर्चातून शाळेला भेट दिले प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्योती खंडागळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी शिक्षिका ज्योती गायकवाड यांनी आभार मानले.



# जागतिक महिला दिनानिमित्त खेळ पैठणीचा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे जागतिक महिला दिनानिमित्त "खेळ पैठणीचा सन्मान महिलांचा - होम मिनिस्टर" हा कार्यक्रम जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ यांनी आयोजित केला होता. यावेळी माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार श्री हरीभाऊ बागडे नाना यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

हा कार्यक्रम पुजा खांबळकर यांनी सादर केला असून विविध स्पर्धा या कार्यक्रमात घेण्यात आल्या तसेच विविध बक्षिसे देखील महिलांना यावेळी जिंकले. यावेळी सौ. मालतीताई सुहासभाऊ शिरसाठ, भाजपा जेष्ठ नेत्या तथा देवगिरी बँकेच्या संचालिका श्रीमती मंगलताई वाहेगावकर(काकू), भाजपा जिल्हा सरचिटणीस सौ. ऐश्वर्याताई अभिषेक गाडेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका सौ. सविताताई फुके, भाजपा महिला मोर्चा छत्रपती संभाजीनगर तालुकाध्यक्षा श्रीमती सरसाताई वाघ, फुलंब्री भाजपा महिला मोर्चा तालुकाध्यक्षा सौ. सविता नवले, रत्नाताई सोनवणे यांच्यासह आदी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सोमवारी चंद्रदर्शन झाले, पवित्र रमजान महिन्याच्या उपवासाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** सोमवार दि.११रोजी संध्याकाळी नमाजे मगरीब नंतर मुस्लिम बांधवांना चंद्रदर्शन झाल्याने पवित्र रमजान महिन्याच्या उपवासाला दि.१२ उपवास (रोजा) ला सुरुवात झाली आहे. वर्षातून एक महिना उपवास (रोजा) म्हणजे रोजा मग अकरा महिने सर्वसामान्यपणे जगायचं असं चक्र मुस्लिम बांधवांनी ठरवलेले आहे. यात दिवसभर चौदा तासाचा रोजा त्यात नियमित नमाजे फजर, जोहर, असर, मगरिब, इशा पाच नमाजी तर नमाजे इशा नंतर रमजानची वीस रकात नमाजे तरावी तर पुन्हा सकाळी चार वाजता उठुन नमाजे तहाजुद तदनंतर सहेरी (जेवन) व पुन्हा फजर नमाज तर तसबी ,कुरान पठण, नफील नमाजे अशा घटनाक्रम रमजान महिना,महिनाभर सुरु राहील असी इबादत अल्लाहला राजी करण्यासाठीं महिनाभर मुस्लिम बांधव करण्यात मग्न असतात मजुर- व्यावसायीक नौकर दार दैनंदिन कामांना मागेपुढे करुन रमजान महिन्यात इबादत करत असतात व दैनंदिन रोजा उपवासासाठी विविध फलफलाळु विविध पकवान उपवास धारकांना होईल तेवढं खर्च करण्यात पुढाकार घेतात तर गोरगरिबांना कपडे पैसे धान्य आदिची वाटप मुस्लिम बांधव करत असतात.जेवढंहोईल तेवढ खर्च करण्यात ते सदैव रमजान महिन्यात तयार असतात मंगळवार दि.१२रोजा उपवासाला सुरुवात झाली असुण सर्वत्र मस्जिद मधे नमाजी साठी गर्दीचे चित्र आहे.यापेक्षा अधिक गर्दी शुक्रवार जुम्मा नमाज साठी उलटणार आहे.हे विशेष. जुम्मा नमाजीला रमजान महिन्यात अधिकचे महत्व आहे.त्यामुळे सर्वच मुस्लिम बांधव रमजान मधे विशेष लक्ष घालून नमाज अदा करतात. रमजान महिन्यांत फर्ज नमाजीचे महत्व म्हणजे सत्तर दर्जा ने वाढतात तर सुन्नत नफील नमाज फर्ज च्या दर्जेत येतात यासाठी पवित्र रमजान महिन्यात नमाज रोजे जकात प्रक्रियात मुस्लिम बांधव आअर्जून सहभाग घेतात हे विशेष.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# शुभेच्छांच्या वर्षावात आ. नीलेश लंके यांचा वाढदिवस साजरा !

## हजारो नागरिकांकडून आ. लंके यांना शालेय साहित्याची भेट : महाराष्ट्रभरातून चाहत्यांची हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**पारनेर :** आमदार नीलेश लंके यांचा ४४ वा वाढदिवस शुभेच्छांच्या वर्षावात मोठया उत्साहात साजरा झाला. हजारो नागरिकांनी आ. लंके यांची नगर, सुपा, हंगा तसेच पारनेर येथे भेट घेऊन लंके यांना शुभेच्छा देत त्यांना शालेय साहित्याची भेट दिली. राज्याच्या विविध भागातील हजारो चाहत्यांनी लंके यांची भेट घेत शुभेच्छा दिल्या. आ. लंके यांच्या वाढदिवसानिमित्त शिरूर येथील सिंधूताई सपकाळ अनाथ आश्रमात विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले. संगमनेर येथील वृध्दाश्रमातील वृध्दांना अन्नदान व कपडयांचे वितरण करण्यात आले. नगर शहरात ग्रामदैवत विशाल गणपती येथे आ. नीलेश लंके यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आ. लंके यांना शुभेच्छा देण्यासाठी विशेषतः नगर दक्षिण मतदारसंघातीली सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते यांनी आ. लंके यांना शुभेच्छा देण्यासाठी केलेली गर्दी लक्षणीय ठरली. नगर जिल्ह्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, अक्कलकोट, बेळगांव, निपाणी, पुणे, बीड, औरंगाबाद, मुंबई येथील असंख्य लंके समर्थकांनी आ. लंके यांना शुभेच्छा देण्यासाठी हजेरी लावली होती. विविध सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्याचा आ. नीलेश लंके यांचा शिरस्ता आहे. वाढदिवसासाठी शाल, हार, तुरे, बुके किंवा इतर भेट वस्तू न आणता शालेय साहित्य देण्याचे आवाहन आ. लंके यांनी केले होते. लंके यांच्या आवाहानास प्रतिसाद देत लंके यांच्या चाहत्यांनी मोठया प्रमाणावर शालेय साहित्याची भेट दिली.






# लाकडी स्टॉकयार्ड संदर्भात पेपरमील व वनविभाग प्रशासनासोबत बैठकीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** 11 मार्च रोजी आम आदमी पार्टी तर्फे उपविभागीय अधिकारी यांना निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले. बल्लारपूर शहरात काही काळापासून वन्यजीवांचा हैदोस वाढलेला आहे. वन्य जीवांमुळे काही नागरिकांना जीव देखील गमवावे लागले. शहरात पेपर मील चे लखडाचे स्टॉक यार्ड वन्य प्राण्यांना लपून बसण्यास जागा बनली आहे व यामुळेच वन्य जीव शहरात प्रवेश करतात अशी माहिती शहराध्यक्ष रविभाऊ पुप्पलवार यांनी दिली व उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन पेपर मील व वन विभाग प्रशासनासोबत बैठकची मागणी केली. व कोणत्या नियमाने शहरात लाखडाचे स्टॉक यार्ड बनवले गेले ? कळमना येथे घडलेल्या अपघाता सारखे अपघात बल्लारपूर शहरातील लाकड़ी स्टॉक यार्डमध्ये झाले तर त्याची जबाबदारी कोणाची ? असा प्रश्न देखील उपस्थित केला. यावेळेस शाहराध्यक्ष रविभाऊ पुप्पलावर, उपाध्यक्ष अफजल अली, सचिव ज्योतिताई बाबरे, प्रवक्ता आसिफ शेख, युथ अध्यक्ष सागर कांबळे, महिला अध्यक्षा किरण खन्ना, सलमा सिद्दिकी, मनीषा अकोले, शिरीन सिद्दिकी, रेखा भोगे, गणेश अकोले, प्रणय नगराळे इत्यादी उपस्थित होते.

# जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या फुलंब्री तालुकाध्यक्षपदी रऊफ शेख बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुका मराठी पत्रकार संघाच्या फुलंब्री तालुका अध्यक्षपदी रऊफ शेख यांची निवड दि. 9 रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात जिल्हा मराठी पत्रकार सघाची फुलंब्री तालुका कार्यकारणी मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून अध्यक्षपदापासून ते प्रसिद्धी प्रमुखा पर्यंत सर्वच निवडी या बिनविरोध करण्यात आल्या. जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या व तिने फुलंब्री तालुका कार्यकारिणीची निवड आज रोजी करण्यात आली असून जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सदस्य सैय्यदलाल यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पार पडली असून फुलंब्री तालुकाध्यक्षपदी लोकमत चे रऊफ शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून उपाध्यक्ष म्हणून जेष्ठ पत्रकार संजय मोरे,बाबासाहेब सोनवणे व रमेश दणके यांची निवड करण्यात आली असून जिल्हा कमिटीवर सुभाष नांगरे यांची निवड करण्यात आली असून सचिव म्हणून MCN NEWS चॅनलचे तालुका प्रतिनिधी महावीर जैस्वाल यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून सहसचिव पदी प्रकाश पायगव्हान, तर कोशाध्यक्षपदी शेख इस्माईल व सहकोषाध्यक्ष पदी अकबर शहा, सल्लागार म्हणून सुरेश बोकील तरसहसलागार म्हणून उस्मान पठाण व प्रसिद्धी प्रमुख म्हणून फिरोज पठाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून यात सदस्य म्हणून अलीम शाह, काळू म्हस्के, सलिम शाह, सरफराज पटेल, अशोक बर्डे, अमोल दणके, इम्रान खान याचा समावेश असून या निवडीबद्दल सर्व पत्रकाराचा सत्कार करण्यात आला.





# पोलिसांकडून अवैध सुगंधित तंबाखू जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची घुग्घुस येथे गुटखा प्रतिबंधित सुगंधित तंबाखु विक्रेत्यावर धडक कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन चंद्रपुर यांचे आदेशान्वये चंद्रपर जिल्ह्यामध्ये अवैध धंद्यावर कडक कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखा यांना दिले. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक महेश कोंडावार स्थानिक गुन्हे शाखा यांनी एक पथक नेमून त्यांना अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले. दि. 11 रोजी गंजी गोपनिय माहातीगार यांनी खात्रीशीर माहीती दिली की, पोलीस स्टेशन घुग्घुस अंतर्गत मोजा नकोडा येथे चंद्रपुर जिलधातील गुटखा तस्कर वसिम झिंगरी याने एका स्थानिक विक्रेता याचे घरी शासनाने प्रतिबंधित केलेला सुंगधित गुटखा, तंबाखू याचा साठा करुन ठेवला आहे. अशा खात्रीशिर माहीती वरुन पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांचे आदेशाने तपास पथकाने मौजा नकोडा येथील रहीवासी मोहम्मद नदीम इक्याल मोहम्मद जियाऊद्दीन शेख वय 36 वर्षे रा. नकोडा याचे घरी पंचासह जावुन झडती घेतली असता पुढील प्रमाणं मुद्देमाल मिळुन आला. सदर प्रतिबंधित सुगंधित तंबाखु गुटखा याचे बाबत विचारणा केली असता नमुद मुद्देमाल हा चंद्रपुर येथिल वसिम झिंगरो याने आणुन टाकल्याचे सांगितले आहे. सदर जप्त मुद्देमाल हा शासनाने प्रतिबंधित केलेला असल्याने आरोपी यांनी अवैधरित्या विक्रीकरीता साठवून ठेवल्याने आरोपी नाम 1) मोहम्मद नदीम इक्बाल मोहम्मद जियाऊद्दीन शेख वय 36 वर्षे रा.नकोडा, 2) वसिम झिंगरी रा. घुटकाळा वार्ड चंद्रपुर यांचे विरुद पोलीस स्टेशन घुग्घुस अपराद क्र. 101/2024 कलम 328,188,272,273,34 भादवी सह कलम 30 (2), 26 (2) (30), 3, 4, 59 (1) अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम नुसार गुन्हा नोंद केला असून पुढील कायदेशीर कारवाई करणेकरीता जप्त मुद्देमाल व आरोपी मोहम्मद नदीम इक्बाल मोहम्मद जियाऊद्दीन शेख वय 36 वर्ष रा. नकोडा यास पोलीस स्टेशन घुग्घुस यांचं ताब्यात देण्यात आले. उपरोक्त कारवाई मा. पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. रिना जनबंधु यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. महेश कोंडावार यांचे आदेशाने सापोनि नागेश चतरकर, पोउपनि विनोद भुरले, पोहवा धनराज करकाडे, स्वामीदास चालेकर, गजानन नागरे, अजय चागेसर, गोअं. प्रशांत नागोसे चापोहवा दिनेश अराडे यांनी केली.

